सोमवार, १ मे २०२३
⊙ किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -२३६
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ● MONDAY 1 MAY 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-236 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5

# जनतेच्या चरणांवरचा प्रसाद म्हणजे मन की बात : मोदी

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : नरेंद्र मोदी यांच्या मन की बात चा 100वा भाग रविवारी प्रसारित झाला. देवरुपी जनतेच्या चरणांवरचा प्रसाद म्हणजे मन की बात असल्याचे यावेळी मोदी म्हणाले. मन की बात हा माझ्यासाठी आध्यात्मिक प्रवास असल्याचेही मोदींनी सांगितले. यावेळी पंतप्रधान मोदींनी मुख्यमंत्री ते पंतप्रधान असा प्रवास करताना झालेला एक बदलही सांगितला. त्यावर मात करण्यासाठी मन की बातमधून मार्ग मिळाल्याचे ते म्हणाले. भाजपच्या वतीने देशभरात मन की बातचे आयोजन करण्यात आले होते.**



पन्नास वर्षांपूर्वी मी माझे घर यासाठी सोडले नव्हते की एक दिवस आपल्याच देशातील लोकांशी संपर्क करणे कठीण जाईल. माझे देशवासिय हे माझ्यासाठी सर्वकाही आहेत. मी त्यांच्यापासून दूर नाही राहू शकत. मन की बातने मला यातून मार्ग दिला. सामान्य माणसाशी जोडण्याचा मार्ग दाखवला. मी २०१४ ला दिल्लीला आलो. त्याआधी गुजरातमध्ये मुख्यमंत्री होतो तेव्हा लोकांशी बोलणे व्हायचे, भेटणे व्हायचे. दिल्लीत आल्यानंतर मला दिसले की इथले आयुष्य खूपच वेगळे आहे. कामाची पद्धत वेगळी आहे. जबाबदाऱ्या वेगळ्या आहेत. स्थिती , परिस्थितीचे बंधन आहे. सुरक्षेचे प्रोटोकॉल आहेत. वेळेचीही मर्यादा असते. दिल्लीला आल्यानंतर सुरुवातीच्या दिवसात मला थोडे वेगळे वाटत होते. खूप रिकामे रिकामे वाटायचे. पन्नास वर्षांपूर्वी म घर लोकांपासून दूर व्हायला नव्हतं सोडले. देशवासियच माझे सर्वस्व आहेत. मी त्यांच्यापासून दूर नाही राहू शकत. मन की बातमुळे मला पुन्हा त्या लोकांशी संपर्क साधता आला. पदभार, प्रोटोकॉल व्यवस्थेपर्यंतच मर्यादित राहिला असे मोदींनी म्हटले. प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या रविवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी मन की बात करतात. विजयादशमीच्या मुहूर्तावर 3 ऑक्टोबर 2014 रोजी या कार्यक्रमाची सुरुवात झाली होती. याआधीचा एपिसोड 26 फेब्रुवारी रोजी प्रसारित करण्यात आला होता. मन की बात हा कार्यक्रम दर महिन्याच्या रविवारी ऑल इंडिया रेडिओवरून प्रसारीत होणारा कार्यक्रम आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी या माध्यमातून देशवासियांशी संवाद साधतात. ज्याचे प्रसारण डीडी नेटवर्कवरही केले जाते. फक्त 30 मिनिटांचा हा कार्यक्रम. आज 30 एप्रिल रोजी याचे 100 एपिसोड पूर्ण होणार आहे. त्याआधी पीएम मोदींच्या या मन की बातचा देशावर नक्की काय परिणाम झाला, याचा रिपोर्ट सादर करण्यात आला आहे.

## पुढील पाच दिवस अवकाळीचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** एप्रिल महिन्यांत राज्यातील विविध भागात अवकाळी पावसानं हजेरी लावली आहे. तर काही ठिकाणी गारपीट देखील झाली आहे. याचा मोठा फटका शेती पिकांना बसला आहे. त्यामुळं शेतकरी संकटात सापडले आहेत. राज्यातील बुलढाणा, चंद्रपूर, सोलापूर, अमरावती, बीड जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. यामध्ये शेती पिकांसह घरांचेही मोठे नुकसान झाले आहे. अनेकांचा संसार या वादळी पावसामुळं उघड्यावर पडला आहे. हवामान खात्याने आता राज्यात पुढील पाच दिवस देखील अवकाळी पावसाचा इशारा दिला आहे. मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील जिल्ह्यांत अवकाळी पाऊस बरसण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. विदर्भ आणि मराठवाड्यातील काही जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. तर गडचिरोली, गोंदिया आणि चंद्रपुरसाठी ऑरेंज अलर्ट देण्यात आला असून वादळी वाऱ्यासह गारपिटीची शक्यता देखील वर्तवण्यात आली आहे. मराठवाड्यामधील परभणी, हिंगोली, नांदेड आणि लातुरात ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. तसेच वादळी वाऱ्यासह काही ठिकाणी गारपिटीचा अंदाज देखील वर्तवण्यात आला आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील अनेक भागात जोरदार अवकाळी पाऊस झाला. पावसामुळं वातावरणात कमालीचा गारवा आहे. चंद्रपूर शहर आणि जिल्ह्यात पुन्हा एकदा मुसळधार पावसानं हजेरी लावली. जवळपास एक तास पाऊस बरसला. मुसळधार पावसानं चंद्रपूर शहरातल्या अनेक भागात पाणी साचले होते. सांगोली तालुक्यातील वाढेगाव परिसरातील दिघे वस्ती, हजारे वस्ती इंगोले बामणे वस्ती या भागातील वादळी वाऱ्यामुळं अनेक घरावरील पत्रे उडून गेले आहेत.


## गुळाची ढेप समजून महिलेने फोडला बॉम्ब

आधुनिक केसरी न्यूज

**पाटना :** बिहारमधील बक्सर जिल्ह्यातील इटाढी पोलीस ठाणे अंतर्गत येणाऱ्या बालादेवा गावात शनिवारी एक धक्कादायक घटना घडली आहे. बॉम्ब फुटून येथील एक महिला जबर जखमी झाली आहे. स्थानिक रुग्णालयात योग्य उपचार होऊ न शकल्याने या महिलेला वाराणसीच्या रुग्णलयात हलवण्यात आले. या घटनेबाबत मिळालेल्या माहितीनुसार बालादेवा गावातील रामनाथ राम यांची पत्नी शांती देवी ( ६५ ) यांनी गूळ समजून बॉम्ब फोडला. या स्फोटात ती जबर जखमी झाली आहे. या प्रकरणाची माहिती देताना पोलीस अधीक्षक मनीष कुमार म्हणाले की, ही महिला घरात काहीतरी कुटण्याचे काम करत होती. ते करत असताना अचानक स्फोट झाला. महिलेच्या घरातील सदस्यांनी सांगितले की, शांती देवी सकाळी काहीतरी कुटण्याचे काम करत होत्या. त्यांनी पहाटे चारच्या सुमारास गडद अंधार असताना घरातले काहीतरी साहित्य घेतले. गुळाची ढेप समजून त्यांनी ती वस्तू कुटण्याचा प्रयत्न केला. तेव्हा मोठा स्फोट झाला. दरम्यान, तिथे अजून बॉम्ब असू शकतात, या भितीने बॉम्ब शोधक पथकाला पाचारण करण्यात आले. परंतु या पथकाला कोणतेही स्फोटक आढळले नाही. निकांकडून मिळालेल्या माहितीनुसार बालादेवा गावातील रामनाथ राम यांची पत्नी सकाळी चारच्या सुमारास चहा बनवण्यासाठी गुळाची ढेप समजून कुटत होती. तिने ती वस्तू कुटण्याचा प्रयत्न करताच मोठा स्फोट झाला. या स्फोटाचा आवाज ऐकून आसपासचे लोक घाबरले. सर्वांनी रामनाथ राम यांच्या घराकडे धाव घेतली. तसेच घरातली मंडळी छतावर पोहचली. सर्वांनी पाहिले की, शांती देवी जखमी अवस्थेत पडल्या होत्या. त्यांना आधी बक्सर प्राथमिक रुग्णालयात दाखल करण्यात आले. यानंतर त्यांना अधिक उपचारांसाठी वाराणसीला रेफर करण्यात आले. पोलीस सर्व बाजूंनी घटनेचा तपास करत असले तरी अद्याप काहीही हाती लागलेले नाही. पोलीस नक्षलवादी अँगल तपासत आहेत. त्याचबरोबर या घटनेनेतर परिसरात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.











# सिंगापूरचा भाग्यविधाता - ली क्वान यू

आधुनिक केसरी

त्याच्या हाती देश नुसताच सुरक्षित नसतो, तर प्रगतीची नवनवीन शिखरे गाठतो. सिंगापूरच्या या कुशल कप्तानाचे नाव आहे ली क्वान यू.
९ ऑगस्ट हा दिवस आपण क्रांतिदिन म्हणून साजरा करतो. ९ ऑगस्ट १९६५ ला मध्ये सिंगापूरमध्ये सुद्धा एक क्रांतिकारी घटना घडली. मलेशिया फेडरेशनमध्ये असलेल्या या छोट्याशा देशाला त्यांच्या आपसातील मतभेदामुळे मलेशियाने वेगळे केले. सिंगापूरसह सशक्त मलेशियाचे स्वप्न पाहणाऱ्या ली क्वान यू यांचा चांगलाच अपेक्षाभंग झाला होता. ब्रिटिशाना वाटत होते की स्वतंत्र झालेला हा देश एक दिवसही आपल्या मदतीशिवाय जगू शकणार नाही. या अचानक आलेल्या संकटाने ली काही क्षण भावुक झाले. अश्रुपूर्ण नेत्रांनी त्यांनी पत्रकारांसमोर, सिंगापूरवासीयांसमोर आपल्या भावनांना मुक्त वाट करून दिली. त्यांचा हा भावनाउद्रेक साऱ्या जगाने पाहिला. आता सिंगापूर वासियांना पिण्याचे पाणी सुद्धा फेडरेशन ऑफ मलाया यांच्याकडून घ्यावे लागणार होते. अत्यंत बुद्धिमान असलेले ली काही क्षण गांगरले होते. पण त्यांनी स्वतःला सावरले आणि आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने हा आधुनिक विश्वकर्मा सिंगापूरच्या विकासासाठी पुढे सरसावला. सगळ्या जगाने आश्चर्याने तोंडात बोट घालावं अशी प्रगती त्याने करून दाखवली. सिंगापूरचा तो भाग्यविधाता ठरला. ली यांनी आपल्या सहकाऱ्यांना पाचारण केले. सर्व खात्यांची पुनर्बांधणी करण्याच्या दृष्टीने त्यांच्याशी चर्चा केली. अंतर्गत सुरक्षा व संरक्षण खाते एकत्र करून त्याची जबाबदारी आपल्या अत्यंत विश्वासू अशा गोह केंग स्वी यांच्यावर सोपवली. लिम किन सिम आणि एस राजरत्नम याना अनुक्रमे अर्थ आणि परराष्ट्र खाते दिले. मलाया, बोर्निया, सारावाक येथून उपलब्ध होणाऱ्या रबर, टिन , पाम तेल इ. ची निर्यात सिंगापूर बंदरातून होत होती. या व्यापाराला मलेशियाचा आर्थिक, राजनैतिक आधार होता. सिंगापूरची जनता एकसंध नव्हती. विविध प्रकारचे लोक वेगवेगळ्या कारणांनी सिंगापूरला स्थायिक झाले होते. स्थलांतरित चिनी, भारतीय आणि युरेशिअन्स यांच्या जोडीला व्यापारानिमित्त आलेले अरब आणि तेथील स्थानिक मलायी आदी लोकांची वस्ती होती.



## आनंदी पहाट

# कुंडलीचा एक शास्त्र म्हणून विचार करावा

आधुनिक केसरी


विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपल्या दैनंदिन जीवनांत आपल्या विचार, वर्तन आणि व्यवहारांत सतत अडचणी, समस्या यायला लागल्या कि आपण आपल्या नशिबाला दोष द्यायला लागतो. जेव्हा दोष नशिबाला दिला जातो तेव्हा चर्चा आपल्या कुंडलीतील ग्रह दोषांशी संबंधित व्हायला लागते. त्या विषयी मनांत अनेक प्रकाराच्या शंका यायला सुरुवात होऊ लागते. कुंडलीचा एक शास्त्र म्हणून विचार करायला काहीच हरकत नाही. परंतू काही जण त्याच्या इतके आहारी जातात, कि त्यांच्या प्रत्येक विचार, वर्तन, व्यवहारासाठी त्यांची कुंडली दाखवली, पाहिली जात असते. काहीजण घराचा उंबरा सुद्धा कधी ओलांडायचा हे कुंडलीतील ग्रह स्थितीनुसार ठरवतात. कोणत्या वेळेला, कोणत्या दिवशी, कोणते कार्य / काम करायचं, ते कधीपर्यंत पूर्ण करायचं, त्यावेळी कोणत्या रंगाचे कपडे परिधान करायचे, कोणत्या दिशेकडे तोंड करून चर्चा, काम करायचं अशा अनेक बाबींचा प्राधान्यानं विचार केला जातो, त्या कृतीत आणल्या जातात.

एखादी व्यक्ती ह्या सर्वाच्या इतकी आहारी कशी काय जाऊ शकते ? हाच खरं तर कळीचा मुद्दा आहे. स्वतःच्या आत्मविश्वासाचं अशा कारणामुळे खच्चीकरण होत असतं, ह्याची देखील त्या व्यक्तीला जाणीव होत नसते. मनोबलाच्या जोरावर यश प्राप्त करू शकणारी एखादी व्यक्ती काहीवेळा ह्या चक्रव्यूहात अडकण्याची अधिक शक्यता असते, हे न समजण्याचीच उणिव त्या व्यक्तीत निर्माण झालेली असते. कुंडलीच्या कुबड्यांवर चालायला सुरुवात झाली कि त्या सोडून स्वतंत्ररित्या स्वतःच्या पायावर चालणं हळूहळू कमी व्हायला लागतं; तेच कालांतरानं तापदायक, त्रासदायक, घातक ठरायला लागतं. एक शास्त्र म्हणून कुंडलीचा सखोल अभ्यास असणारे असे किती असतील, कि जे प्रत्येकाच्या संपर्कांत येऊ शकतात. अन्यथा पत्रिका पाहण्याच्या बहाण्यानं हजारोंचा गंडा घालणारेच जास्त असल्याचं समजतं.



आधुनिक केसरी

**परमानंद चित्ती | नांदे सदा ||**

ऐहिक सुखाची | धरू नको आस ||
तोचि गळफास | जाण जीवा ||१||
विकाराची बाधा | होऊ नये मना ||
अनंत यातना | भोगशील ||२||
जाणावा तोलून |आपुला परका ||
अनुभवा सारखा | गुरू नाही ||३||
लावूनिया ताटी | साधावा एकांत ||
आत्मचिंतनात | मग्न व्हावे ||४||
आत्मिक सुखाची | येता अनुभुती ||
परमानंद चित्ती | नांदे सदा ||५||


प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# निरुपण


आधुनिक केसरी

चिन्तयतां समाधानं
स्वस्य मार्गेण गच्छताम्।
सुखं हन्तुं न शक्नोति
भूतले कोऽपि तद् तथा।।
तसेच समाधान म्हणजे
उत्तराचा विचार करणा-या, स्वतःच्या
मार्गाने जाणा-या लोकांचे सुख या
भूतलावर कोणीही नष्ट
करू शकत नाही.


डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

प्राकृत धन परिपूर्ण है,
फिर सन्तोष न आव ।
आश लगी पुनि अधिक की, यह दुख नीच स्वभाव ।।३२।। (स्वर्वेद पंचम मण्डल एकादश अध्याय) ०५/११/३२
**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**
प्राकृतिक धन परिपूर्ण आहे तरीही संतोष (समाधान) होत नाही. अजून काहितरी मिळवण्याची आस लागलेली आहे. असा पतनशील स्वभाव असणे हे दुःख आहे.


स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

# सूक्ष्म आशंका निरुपण


आधुनिक केसरी


सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

बुहदारण्यक उपनिशदनेह नानस्ति किंचन अर्थ-- परमात्मा स्वरूप शूध्द, नित्य, केवळ एकच एक सर्वव्यापी, अविकारी, निर्गुण, सुक्ष्म, अद्रुष्य आहे. सगुण स्थुल द्रुष्य आहे.तरी आपल्या सा रख्या सामान्यांना खरे वाटते. ज्ञानी पुरूषाचा अनुभव सर्वस्वी खराच असतो. आणि सामान्यांचा खोटा असतो हाच तो फरक आहे. मूळ अविकारी ब्रम्हस्वरूपातचं विकारी नाशवंत द्रयुष्य विश्व निर्माण झालेच कसे हे अद्वैत वेदांताला सांगणे भाग पडते.निर्गुण ब्रम्ह निष्क्रिय व निर्विकारी आहे असे जर मानले तर त्याने हे सगुण, सक्रिय,सविकारी विश्व निर्माण केले असे म्हणता येत नाही. या विश्वाचे कर्तेपण ब्रम्हावर लादले तर ब्रम्ह निष्क्रिय व निर्गुण रहात नाही. आपण एकवेळ विश्वास ठेऊ की विश्व निर्माण झाले असे म्हणावे तर गुरू-शिष्य, श्रोता-वक्ता, अनेक उपनिषदे फार काय आपण अभ्यासत असलेला "दासबोध"या सर्वाचाच फार मोठा प्रश्न निर्माण होतो. या सर्वाचे ऊत्तर शोधण्याचा प्रयत्न म्हणजे आपण आता अभ्यासत असलेला समास"सुक्ष्म आशंकानिरूपण होय."या सर्वाचा साधेपणाने विचार करून,आपण समर्थाच्या विचारांचा प्रभाव आपल्यावर पाडण्याचा विचार करूया. यासाठी श्रीमत दासबोधाचा अभ्यास करूया.आपल्यातील अज्ञान दूर करण्याचा प्रयत्न करूया. हेच या समासाच्या निमित्ताने सांगणे होय.

# सत्संगतीचे दोन प्रकार

आधुनिक केसरी



सत्संगती अती अपूर्व काम करणारी आहे. संतांची संगत दोन प्रकारे होऊ शकते. एक, संतांच्या देहाची; दुसरी, संतांनी सांगितलेले साधन करीत राहण्याची. यांपैकी पहिली, म्हणजे संताच्या देहाची संगती लाभणे फार कठीण आणि दुर्मिळ. कारण संत जरी खरा असला तरी त्याला ओळखणे कठीण असते, आणि पुष्कळदा त्याच्या बाह्य वागणुकीवरून मनात विकल्प येण्याचा संभव असतो; आणि एखाद्या भोंदूशीच गाठ पडली तर त्याच्या संगतीपासून नुकसान हे ठरलेलेच. म्हणून पहिला, म्हणजे संताच्या देहाच्या संगतीचा मार्ग, हा पुष्कळदा धोक्याचा ठरण्याचा संभव असतो. दुसऱ्या मार्गाने जाण्यात, म्हणजे त्याने सांगितलेले साधन करण्यात, बिलकूल धोका नसतो; कारण खरा संत काय किंवा भोंदू साधू काय, कोणीही झाला तरी तो दुसऱ्याला सांगताना खरे आणि बरोबर असेल तेच सांगेल. तो भोंदू असला तरी, आपला भोंदूपणा लपविण्याकरिता, जे बरोबर असेल तेच सांगणे त्याला जरूर असते. साधकाने शुद्ध भावनेने ते साधन केले की सत्संगतीचा फायदा मिळून त्याचे काम होते. खऱ्या संताच्या देहाच्या संगतीचा लाभ जर दैववशात् प्राप्त झाला तर मात्र काम बेमालूम होते. ज्या वाहनाचा आपण आश्रय करतो त्या वाहनाचा वेग हा आपला वेग होतो; फक्त त्या वाहनात निश्चल बसून राहणे एवढेच आपले काम असते. तसे आपण खऱ्या संताजवळ नुसते पडून राहावे. संताच्या संगतीत आपली कृती अशी काहीच नसते, नुसते अस्तित्व असते. त्यामुळे अहंकाराला वाव न राहून वासनेचा क्षय व्हायला फार मदत होते. तुकाराम महाराजांनी देवाजवळ धनसंपदा मागितली नाही, मुक्तीदेखील नको असे म्हटले, फक्त संतसंगती दे असे म्हटले.
संतसंगाने नाम घेण्याची बुद्धी येते. बुद्धीची स्थिरता ठेवणे हे फक्त नामानेच साधेल. नाम जरूर तेवढे ठेवते आणि बाकीचे नष्ट करून टाकते. पण अनन्यभावाने नाम घ्यावे. नाम घेता घेता बुद्धीला स्थिरता येते; आणि मग मनात विकल्प न येता संतांच्या देहाच्या संगतीचा खरा फायदा घेता येतो. सत्संगतीत कष्टाशिवाय ईश्वरप्राप्ती होते. संतसंगतीत साधने आपोआप होत असतात. त्यांच्या पूजनाबरोबर पूजन, भजनाबरोबर भजन, श्रवणाबरोबर श्रवण, स्मरणाबरोबर स्मरण आपोआप होते.
सत्संगतीत स्वतःची विस्मृती होते आणि नामस्मरण घडते. म्हणून प्रयत्नाने संतसंगती करावी. तिथे प्रारब्ध आणू नये. सत्संगतीत राहून नाम घेतले तर देहबुद्धीच्या कोंडीतून बाहेर पडता येते.
**आजचे बोधवचन आहे – संतांना जे आवडते ते आपल्याला आवडणे म्हणजे त्यांचा समागम करणे होय.**

# निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी



**अभीप्सितार्थसिद्ध्यर्थं पूजितो यः सुरासुरैः ।**
**सर्वविघ्नहरस्तस्मै गणाधिपतये नमः ॥**
**स्पष्टीकरण – गणपती हा सुखकर्ता व दुःखहर्ता देव आहे. म्हणून प्रत्येक शुभ कार्याच्या प्रारंभी गणपतीचे पूजन, निदान स्मरण तरी करतात. बहुतेक ग्रंथांच्या आरंभी गणपतीचे स्तवन असते. म्हणून आपणही आरंभी त्याचे स्मरण करू या.**

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
सोमवार, १ मे २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari

# पाटणा येथे विरोधी पक्षांच्या नेत्यांची बैठक

## मुख्यमंत्री नितीश कुमार यांचे संकेत



आधुनिक केसरी न्यूज

**पाटणा :** कर्नाटक विधानसभा निवडणुकीनंतर पाटणा येथे विरोधी पक्षांच्या नेत्यांची बैठक होण्याची शक्यता असल्याचे संकेत बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी दिले. संयुक्त जनता दलाचे (जदयू) प्रमुख असलेल्या नितीश कुमार यांनी सांगितले की, या बैठकीत विरोधी पक्षांच्या एकजुटीच्या मुद्द्यावर चर्चा होण्याची शक्यता आहे. या बैठकीच्या निमित्ताने आम्ही नक्कीच एकत्र येऊ आणि २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपचा समर्थपणे मुकाबला करण्यासाठी विरोधी पक्षांच्या एकजुटीच्या मुद्द्यावर चर्चा करू.नितीशकुमार यांनी सांगितले, की सध्या काही नेते कर्नाटक विधानसभा निवडणूक प्रचारात गुंतले आहेत. या निवडणुकीनंतर आम्ही आमच्या बैठकीचे ठिकाण निश्चित करू. विरोधी पक्षनेत्यांच्या पुढील बैठकीसाठी एकमताने पाटणा हे स्थळ निवडले तर ही बैठक येथेच होईल. येथे ही बैठक आयोजित करताना आम्हाला आनंदच होईल. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी २४ एप्रिल रोजी कोलकाता येथे नितीशकुमार आणि उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव यांची भेट घेतली होती. यावेळी ममतांनी नितीश यांना आगामी लोकसभा निवडणुकीसाठी विरोधी ऐक्याबाबत चर्चा करण्यासाठी पाटणा येथे सर्व भाजपेतर पक्षांची बैठक आयोजित करण्याचे आवाहन केले. ममता यांनी सांगितले, की मी नितीश कुमार यांना एकच विनंती केली आहे. जयप्रकाशजींच्या आंदोलनाची सुरुवात बिहारमधून झाली होती. अशा बिहारमध्ये सर्वपक्षीय बैठक झाली तर आगामी वाटचालीची दिशा आपण निश्चित करू शकतो.

नितीश कुमार म्हणाले की, ममता यांनी पाटण्यात बैठक व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त केली. आम्ही भाजपप्रणित केंद्र सरकारच्या विरोधात देशातील अधिकाधिक पक्षांना एकत्र करण्याचा प्रयत्न करत आहोत. मी अलीकडेच अनेक भाजपविरोधी पक्षांच्या नेत्यांना भेटलो. इतरही काही पक्षांशी मी चर्चा करणार आहे. लोकसभा निवडणुकीपूर्वी विरोधी पक्षांची एकजूट घडवून आणण्याचे माझे ध्येय आहे.

### लालूप्रसाद-नितीशकुमार चर्चा


बिहारचे माजी मुख्यमंत्री, माजी केंद्रीय मंत्री आणि राष्ट्रीय जनता दलाचे प्रमुख लालुप्रसाद यादव सात महिन्यानंतर बिहारमध्ये पाटण्याला परतले. बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांनी त्यांची भेट घेतली. पुढील वर्षी होणाऱ्या लोकसभा निवडणुकीत भाजपशी दोन हात करण्यासाठी हे दोन्ही नेते हातात हात घालून काम करणार असून, विरोधकांची आघाडी करण्यासाठीही प्रयत्न करणार आहेत. लालूप्रसाद यांचे पाटण्यात आगमन झाल्यानंतर काही तासांनी शुक्रवारी सायंकाळी उशिरा नितीशकुमार लालूप्रसाद आणि माजी मुख्यमंत्री राबडीदेवी यांच्या निवासस्थानी गेले.












## बीएसएनएल ग्राहकांना खुशखबर

आधुनिक केसरी

भारतात सध्या रिलायन्स जिओ , व्हीआय आणि एअरटेल या आघाडीच्या कंपन्या आहेत. त्यामध्ये जिओ आणि एअरटेल या कंपन्यांनी आपली ५जी सेवा अनेक शहरांमध्ये सुरु केली आहे. वोडाफोन आयडिया कंपनीला आपले ५जी नेटवर्क अजून सुरु करता आलेले नाही आहे. मात्र कंपनी त्यावर काम करत आहे. एकीकडे या सर्व कंपन्या आपल्या ५ जी नेटवर्कचा विस्तार करत आहेत. तर दुसऱ्या बाजूला बीएसएनएल ही सरकारी टेलिकॉम कंपनी अजूनही आपल्या ४ जी नेटवर्कवरच काम करत आहे. खरेतर अजूनही बीएसएनएल कंपनी आपले ४जी नेटवर्क लॉन्च करू शकलेली नाही आहे. कंपनी ४जी नेटवर्क सुरु करण्यासाठी देशातील अनेक राज्यांमध्ये काम करत आहे. नुकताच बीएसएनएलने आपला एक पायलट प्रोजेक्ट पंजाब राज्यात सुरु केला होता. आतापर्यंत बीएसएनएलने १३५ टॉवर्स इंस्टॉल केले आहेत. अजून ७५ टॉवर्सवर कंपनी काम करत आहे. बीएसएनएलचे सगळे टॉवर्स इन्स्टॉल झाल्यावर तीन महिने कंपनी याचे टेस्टिंग करणार आहे. त्यानंतर कंपनी ४जी नेटवर्क वरील आपल्या कामाचा वेग अधिक तीव्र करेल. रेल्वे, दळणवळण, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले, पायलट प्रोग्रॅम संपल्यानंतर देशभरात बीएसएनएलच्या टॉवर्सवर काम सुरु होईल. त्यामुळे दररोज २०० टॉवर्स इन्स्टॉल केले जातील. ऑगस्ट महिन्यापर्यंत कंपनी आपले ४जी नेटवर्क लॉन्च करू शकते असे देखील असे देखील अश्विनी वैष्णव म्हणाले. रेल्वेमंत्र्यांनी सांगितले की बीएसएनएलचे ४ जी नेटवर्क ५ जी नेटवर्कच्या रोलआउटसाठी वापरले जाईल. टेलिकॉम ऑपरेटर एक सॉफ्टवेअर अपडेट जारी करेल ज्यानंतर लोकांना 5G सेवा मिळायला सुरुवात होईल. भारती एअरटेल कंपनीने आपले ५जी नेटवर्क ३०० पेक्षा जास्त शहरांमध्ये सुरु केले आहे. कंपनी आपल्या प्रीपेड आणि पोस्टपेड वापरकर्त्यांना काही विशिष्ट प्लॅन्ससह अनलिमिटेड डेटा ऑफर करत आहे. दुसऱ्या बाजूने रिलायन्स जिओने सुद्धा आपले ५जी नेटवर्क अनेक राज्यांमध्ये सुरु केले आहे. देशात सध्या २ टेलिकॉम कंपन्या आहेत, ज्यांनी आपले ५जी नेटवर्क सुरु केले आहे. बजेट कमी असल्यामुळे वोडाफोन-आयडिया कंपनी अजूनही आपले ५जी नेटवर्क सुरु करू शकलेले नाही आहे.

## सुटीचा सदुपयोग करा, नवं काही शिका



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**एप्रिल, मे आणि जून महिने म्हणजे आपल्याकडे शाळांना सुट्टीचा काळ असतो. दहावी-बारावीच्या परीक्षा झालेल्या असतात. साधारण एप्रिलच्या मध्यावर सुट्ट्या लागतात. परीक्षेला कंटाळलेली मुले सुट्टीची अगदी अतुरतेने प्रतीक्षा करीत असतात. काहींचे प्लॅन ठरलेले असतात. कुणाला गावाला जायचं असतं, कुणाला फिरायला जायचं असतं. तर कुणाला काही नवं शिकायचं असतं. काहींना नवं काही वाचायचं असतं. एकूण काय तर सुट्टी एंजॉय करायची असते. कुणाला ती सत्कारणी लावायची असते. सुट्टीचा कालावधी आहे, मौजमजा करायला हरकत नाही.**

पण संपूर्ण सुट्टी अशीच वाया घालवून चालायचं नाही. आपल्याला सुट्टी असली तरी आपण विद्यार्थी आहोत. निरंतर शिकायचं असतं. आपल्याला आवडतं, भावतं, ते शिकायला घ्यायचं! शिकलेलं काही वाया जात नाही. पण काहींना शिकणं म्हणजे पाठ्यपुस्तक वाचणे, अभ्यास करणे असे वाटत राहते. त्यामुळेच आजकालच्या पहिली ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांचा शिकण्याचा कल पाहिला तर तो केवळ शैक्षणिक कालावधीपुरताच दिसून येतो. एकदा का परीक्षा आटोपल्या की मग ही सुट्टी केवळ अन् केवळ या विद्यार्थ्यांच्या हातात मोबाईल आणि कंप्युटरवरचे गेम खेळण्यात व्यतित झालेली दिसून येते.काहींच्या हातात बॅट-बॉल येतो. काहीजण कॅरम खेळतात. त्यातल्या त्यात बैठे खेळांना पहिली पसंदी दिली जाते. अर्थात काही शिकण्यासारखं आहे. नवे खेळ, नवे उद्योग शिकायलाच हवेत. जुने खेळ, क्रीडा प्रकार आता दिसेनासे झाले आहेत. खरे तर मोठ्या लोकांनी अशा खेळ प्रकारांना पाठबळ द्यायला हवं. क्रिएटीव्ही गोष्टींकडे लक्ष द्यायला हवे. मुलांबरोबर पालकांनीदेखील सुट्टीचे नियोजन करायला हवे. आपल्या पाल्याला मदत करावी. अगोदरच पालक मुलांना तुला अमूक करायचे आहे, तमूक करायचे आहे, असे सांगून आपल्या पाल्यांना दडपणाखाली आणलेले असते. अगोदरच पालकांनी बजावून सांगितलेले असते परीक्षा झाल्याखेरीज मोबाईलला हात लावायचा नाही. त्यामुळे कधी एकदा परीक्षा संपतात आणि कधी एकदा मोबाईलवर गेम खेळतो असे होऊन बसलेले असते. हा मोबाईल केवळ काही मिनिटे पालकांच्या हातात नसतो तर तासन् तास ही मुले पालकांचे मोबाईल आपल्या ताब्यात घेऊन बसतात. यामुळे संपूर्ण वेळ, दिवस त्यातच सरून जातो. याचा परिणाम या मुलांच्या डोळयांवर तर होतोच पण त्यांचा मेंदू ही यातच गुरफटून गेल्याने या मुलांचे लक्ष कुणाच्या बोलण्याकडे जात नाही. एकीकडे मोबाईल, एकीकडे टीव्हीवरील कार्यक्रम, कार्टून्स किंवा कंप्युटरवर ही मुलं तासनतास खिळून बसलेली असतात. अशा मुलांना ना भुकेचा अंदाज येत ना त्यांना तहान लागत. मग यातूनच सुरू होतात, शारीरिकपिडा! पालक आज आपल्या मुलांचे लाड काही कमी करत नाहीत. त्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे,म्हणून महागड्या शाळेत पैसे, देणग्या देऊन प्रवेश मिळवतात. लोकांकडे पैसा असल्याखेरीज ही मंडळी आपल्या मुलांना इंग्रजी शाळांमध्ये घालत नाहीत. शिवाय मुलांना काय हवं, ते त्यांचे शब्द खाली पडण्याअगोदरच कुणी तरी ते उचललेले असतात. आता स्वस्तात मिळणाऱ्या स्मार्ट फोनला अगदी गरिबातला गरीब लोकांना देखील पहिली पंसदी आहे. अगदी पहिलीपासूनच नव्हे तर तीन-चार



वर्षाच्या मुलांच्या हातातही मोबाईल हे खेळणं म्हणून असतं. पहिलीपासूनचा अभ्यास हा जरी मुलांच्या शिकण्याचा पाया असला तरी मोबाईलवरील गेम्स, व्हीडिओ, गाणी, आदींच्या सान्निध्यात राहिल्याने मुलांच्या शैक्षणिक जीवनावर त्याचा निश्चितच परिणाम जाणवतो. जाहिरातबाजीचाही या मुलांवर परिणाम झालेला दिसून येतो. ऑनलाईन खरेदी करणे, मोबाईलमध्ये गुंतणे या मुलांना जडलेल्या सवयींकडे पालकांनी लक्ष देणे गरजेचे आहे. शैक्षणिकदृष्टया पाल्य आणि पालक, विद्यार्थी आणि शिक्षक, विद्यार्थी आणि विद्यार्थी असं या मुलांचं नातं घट्ट होत असताना मोबाईलच्या माध्यमातून हे विद्यार्थी दुसरीकडेच भरटकलेले दिसून येतात. सुट्टीमध्ये पालकांसोबत वेळ घालवताना ही मुलं आपल्या कुटुंबामध्ये फार कमी वेळ रमतात. जितकी ती या निर्जीव उपकरणामंध्ये रमतात. याचे परिणाम मुलांच्या स्वभावावर दिसून येतात. मग अबोल राहणं, कुणामध्ये न मिसळणं, वेळेवर जेवण न जेवणं, एकलकोंडेपणा निर्माण होणं, स्वभावात चिडचिडेपणा येणं. आदी गोष्टी या मुलांच्या जीवनावर परिणाम तर करतातच पण शैक्षणिक पातळीवर ही या मुलांच्या श्रेणीवर त्याचा परिणाम होतो. ही सुट्टी जरी मुलांना एंजॉय करायची असेल तर काहीवेळा मामाचं गाव, कुटुंबासमवेत सहली, गावी जाणे किंवा घरातच थांबणे आदी पर्याय निवडले जातात.पण फक्त सुट्टी वाया घालवण्यापेक्षा त्याचा सदुपयोग झाला पाहिजे. आजकाल मुलांचं लक्ष्य मात्र एकच असतं ते म्हणजे मोबाईल, कंम्प्युटर, टीव्ही. प्रवासातही या मुलांच्या हातात मोबाईलच असतो. गेम, व्हीडिओ, गाणी ऐकणे आदी गोष्टींना ही मुलं अधिक प्राधान्य देतात. यामुळे जेव्हा शाळा सुरू होतात तेव्हा मग अचानक अभ्यास हाती घेणे, अभ्यासात मन रमवणे, टयुशन्स आदी गोष्टी या मुलांना नंतर जड जातात कारण आज वास्तव स्थिती पाहिली तर, मोबाईलचं तंत्र या मुलांच्या मेंदूवर एवढं फिट्ट बसलंय की, या मुलांना जडलेली ही सवय सुटू शकेल की नाही, हा प्रश्न अनुत्तरीतच राहतो. कारण आजची मुलं ही ख-या अर्थाने आपलं बालपण विसरत चालली आहेत. साहजिकच सुट्टीत मोबाईल व टीव्हीची डीटॅचमेंट देणारे उपक्रम महत्त्वाचे ठरणार आहेत. सुटीभर मुलांनी मोबाईल आणि टीव्ही स्क्रीनमुक्त राहावे, यासाठी पालकांनी जाणीवपूर्वक प्रयत्न करावेत. एकतर मुले टीव्ही व मोबाईलमध्ये गुंतून पडतात. शाळा व अभ्यास नसल्याने पालकांना देखील मुलांना काय सांगावे, असा प्रश्न पडतो. तसेच मुले स्वतः तर टीव्ही व मोबाईलमध्ये गुंतून पडतात. पालक त्यांच्या आवडीचे कार्यक्रम पाहत असतील तर ते देखील मुले पाहतात. शाळा नसल्याने पालक त्यांना टाळून टीव्ही पाहू शकत नाहीत. म्हणजे उन्हाळी सुटीत या मुलांचा स्क्रीन टाइम वाढतो आहे. मुलांना उत्तम प्रकारची उन्हाळी सुटी घालवण्यासाठी छंद वर्ग, शिबिरे, खेळ प्रशिक्षणे, कला वर्गांची गरज आहे. यामध्ये मुलांनी आवर्जून सहभागी व्हायला पाहिजे. अलीकडे स्वच्छंदी बागडण्याचे, निसर्गाचा आस्वाद घेण्याचे, सट्टीचा खरा अर्थ जाणण्याचेच विसरून गेली आहेत. त्यामुळे शरीराला व्यायाम देणारे, मन स्वच्छंदी करणारे, मैत्रीचा बंध जपणारे खेळही आज लोप पावत चालल्याचेच दिसून येतात. चित्रकला, रांगोळी, एमएससी-आयटी संगणक शिक्षण, एकादी भाषा शिकणे, मोडीलिपीसारख्या लिपीची ओळख करून घेणे, चांगली पुस्तके वाचणे, किराणा दुकानात काम करून तिथली परिस्थिती तो व्यवसाय जाणून घेणे अशा बऱ्याच गोष्टी करता येतात. तबला-पेटीचे शिक्षण, कागदकाम, पोहायला शिकणे, सायकल शिकणे, मेहंदी काढणे अशा किती तरी गोष्टी आहेत. त्याच्या शिकण्याने आपल्या ज्ञानात भर पडते. कौशल्य आत्मसात होते. त्याचा उपयोग आपल्याला आयुष्यात वारंवार करता येतो. ज्याला अधिक कला माहित आहेत, अभ्यास आहे,कौशल्य आहे अशा लोकांना खरे तर मोठा मान असतो. त्यामुळे विद्यार्थी या नात्याने आपण रोज काही ना काही शिकले पाहिजे.

## कामगारांचा हक्काचा दिवस १ मे



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**१ मे हा दिवस जागतिक कामगार दिन म्हणून संपूर्ण जगात साजरा केला जातो. जगभरातील कामगारांचा गौरव करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. केवळ भारतातच नाही तर जगभरातील ८० हुन अधिक देशात या दिवशी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात येते. १९ व्या शतकात झालेल्या औद्योगिक क्रांतीनंतर जगभरातील कामगारांना रोजगार मिळू लागला. रोजगार मिळाला पण कामगारांची पिळवणूक मात्र वाढली. कोणत्याही सुविधा न देता तुटपुंजी मजुरी देत कामगारांना १२ ते १४ तास राबवून घेण्यात येऊ लागले. त्यामुळे कामगारात असंतोष निर्माण झाला.**

या असंतोषातूनच कामगार एकत्र आले व कामगार संघटनांची निर्मिती झाली. या संघटनांनी कामगारांची पिळवणूक थांबवण्यासाठी काही ठराव केले. त्या ठरावात केलेल्या प्रमुख मागण्या १ ) कायद्याने आठ तासांचा दिवस २ ) लहान मुलांना कामावर लावण्यास बंदी ३ ) महिला कामगारांच्या कामावर मर्यादा ४ ) रात्रीचे व धोक्याचे काम यासाठी खास नियम ५ ) कायद्याने साप्ताहिक सुट्टी ६ ) कामाचा मोबदला वस्तूरूपाने न देता नगद द्यावा ७ ) समान कामासाठी समान वेतन या मागण्या २१ एप्रिल १८५६ रोजी ऑस्ट्रेलियातील कामगारांकडून करण्यात आल्या. ऑस्ट्रेलियातील कामगारांच्या मार्गाने जात अमेरिका व कॅनडातील संघटनांनी १ मे १८८६ रोजी मोर्चे व धरणे आंदोलनाची सुरवात केली. अशाच एका मोर्चाला पांगवताना ४ मे १८८६ रोजी झालेल्या गोळीबारात १ आंदोलनकारी ठार झाला. त्याचा निषेध म्हणून जगभरातील कामगार संघटना रस्त्यांवर उतरल्या. त्यात एका अज्ञात व्यक्तीने पोलिसांवर बॉंब टाकला. यात ८ पोलीस मृत्यू पावले, तर ५० पोलीस जखमी झाले. या घटनेच्या स्मरणार्थ १ मे १८८९ रोजी आंतरराष्ट्रीय आंदोलनाचे आयोजन करण्याची मागणी रेमंड लेविन याने पॅरिस येथे झालेल्या दुसऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेत केली. त्या परिषदेत १ मे १८९० हा दिवस जागतिक कामगार दिन म्हणून साजरा करण्याचे निश्चित झाले. १८९१ च्या दुसऱ्या परिषदेत १ मे हा जागतिक कामगार दिन म्हणून साजरा करण्याची औपचारिक घोषणा करण्यात आली. तेंव्हापासून १ मे हा जागतिक कामगार दिन म्हणून जगभरात उत्साहात साजरा केला जातो. १ मे हा दिवस आंतरराष्ट्रीय ऐक्याचा, स्वातंत्र्याचा, मानवाकडून मानवाचे होणाऱ्या पिळवणुकीचा अंत करण्याचा प्रतीक बनला आहे. १९०५ च्या १ मे या कामगार दिनाच्या पत्रिकेत लेनिनने लिहिले आहे, " कामगार - कामगारात, राष्ट्रा - राष्ट्रात, धर्मा - धर्मात असणारे शत्रुत्व नष्ट करा. या शत्रुत्वाने फक्त लुटारुंचा



आणि जुलूमशहांचा फायदा होतो. कारण ते कामगार वर्गातील अज्ञातावर आणि दुफळीवरच जगत असतात. ज्यू आणि ख्रिश्चन, फिन आणि स्वीडिश, आर्मेनीयम आणि तातार, पोलिश आणि रशियन, लॅटिन आणि जर्मन असे सारे भेदभाव विसरून समाजवादाच्या झेंड्याखाली आपण सारे आगेकूच करूया. सर्व देशातील कामगारांची ही ऐक्य शक्ती आंतरराष्ट्रीय समाजवादाची संघशक्ती १ मे ला आपल्या दलाची पाहणी करते आणि स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व यासाठीचा लढा निर्धाराने आणि अविचलपणे पुढे नेण्यासाठी आपले बळ संघटित करते." लेनिनचा हा विचार घेऊन जगभरातील कामगार संघटना आज मार्गक्रमित करीत आहेत. आज जगभरातील कामगार संघटनांपुढे नवे आव्हाने आहेत. जागतिकीकरणाची लाट व २१ व्या शतकातील कामगारांचे प्रश्न, बदललेली परिस्थिती, मस्तवाल झालेले भांडवलदार या नव्या आव्हानांचा मुकाबला कामगार संघटनांना करावा लागणार आहे. काळाचे हे आव्हान कामगार संघटनांनी स्वीकारले पाहिजे. जनतेच्या जगण्याला व कामगारांच्या हक्काला मिळालेले हे आव्हान आहे. याचा मुकाबला संघटित व असंघटित कामगारांच्या एकजुटीनेच होऊ शकतो. कामगार एकजुटीचा विजय असो! जगभरातील कामगारांना कामगार दिनाच्या मनापासून शुभेच्छा!

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# सावळदबारा येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत धूळखात

आधुनिक केसरी न्यूज

**गोकूळसिंग राजपूत**

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे राष्ट्रीय आरोग्य अभियान जि.प.औरंगाबाद अंतर्गत आयुष्मान भारत आरोग्य वर्धिनी केंद्र ही मुख्य इमारत आणि कर्मचारी निवासस्थाने बांधण्यात आली आहे.या प्राथमिक आरोग्य केंद्रास सलग्न सावळदबारा पंचक्रोशीतील एकूण 14 गावे असून जवळपास 20 हजार लोकसंख्या या सर्व गावांची आहे आणि त्यातच फक्त या 14 गावांसाठी एकच प्राथमिक आरोग्य केंद्र असल्यामुळे व 2 उपकेंद्र असून ते पण नेहमीच कर्मचा-या अभावी बंदच राहते. परिणामी या सावळदबारा परिसरातील आरोग्य धोक्यात आले असून सावळदबारा प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी विलास राजपुत यांच्यावर हा पुर्ण भार येऊन पडला .ते या आरोग्य केंद्रात पुर्णवेळ तर देतातच मात्र अपु-या कर्मचारीवर्गामुळे त्यांची मोठी दमशाक होतांना दिसते. या सावळदबारा येथे मागील 2 वर्षापासून नवीन प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीचे बांधकाम चालु होते आणि आज ते पुर्ण झाले. ते बांधून जवळपास 1 वर्षपूर्ण झाले आहे परंतु अद्याप पर्यंत ते सुरू करायला मुहूर्त मिळालेला दिसत नाही. सदर प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारतीचा खर्च हा 5 कोटी रुपये झाला असून तेव्हा ती इमारत बांधण्यात आली. सध्या प्राथमिक आरोग्य हे जि.प. केंदिय प्राथमिक शाळेत गेल्या चार ते पाच वर्षापासून सेवा देत आहे.नवीन बांधलेले प्राथमिक आरोग्य केंद्र हे लवकर सुरू करण्यात यावे अशी मागणी सावळदबारा येथील सामाजिक कार्यकर्ते प्रा.जीवन कोलते पाटील यांनी केली आहे.सावळदबारा हे गाव फर्दापूर सर्कलमधील मोठे गाव आहे. या गावाच्या जवळच देव्हारी,डाभा, पळसखेडा, टिटवी,नादांतांडा, मोलखेडा,घाणेगाव तांडा, नांदा गाव, पिंपळवाडी आदी 12 गावे आहेत. या सर्व गावांना प्राथमिक आरोग्य केंद्र सावळदबारा हेच एकमेव येथे आहे. या प्राथमिक आरोग्य केंद्रात कर्मचारी वर्ग व अधिकारी यांची खूपच संख्या कमी असल्यामुळे रुग्णांना आरोग्य सेवा वेळेत मिळण्यास अडचणी येतात. जाण्या येण्यासाठी ३० ते ३६ किमी वर असलेले बुलढाणायेथे मोठे अंतर पार करावे लागत असल्यामुळे



सावळदबारा येथे शासनाने 5 कोटी रुपये खर्च करून भव्यदिव्य बांधलेले प्राथमिक आरोग्य केंद्र हे फक्त शोभेची वास्तू आहे काय अशी चर्चा त्या परिसरातील नागरिक करत आहे. या ,प्रशस्तअसलेल्या अशाप्राथमिक आरोग्य केंद्राच्या उद्घाटनाला कधी मुहूर्त मिळेल ? का मिळणारच नाही ? इमारत फक्त उद्घाटनाची प्रतीक्षा करत आहे का! ,अशी नागरिकांमध्ये चर्चा होताना दिसत आहे. सावळत बारा येथील प्रगतिशीलशेतकरीव सामाजिक कार्यकर्तेप्राध्यापक जीवन कोलतेयांनी अशी मागणी केली आहे की, हे प्राथमिक आरोग्य केंद्र त्वरित सुरू करुन, या दुर्गम भागातील रुग्णांनाचांगल्या दर्जाची आरोग्य सुविधाआरोग्य सेवादेण्यात यावीया प्राथमिक आरोया प्राथमिक आरोग्य केंद्रातरिक्त असलेले कर्मचारी अधिकारीयांचीही नियुक्तीी करण्यात यावी अशी ही मागणी प्राध्यापक जीवन कोलते यांनी केली आहे त्याच बरोबर परिसरातील नागरिकांनी सुद्धा मागणी केली आहे. सावळदबारा व परिसरातील गावे ही आडवळणी मार्गावर असल्यामुळे रात्री अपरात्री रुग्णांची तब्येत बिघडली किंवा प्रसूती मातांना काही अडचण उदभवली तर त्वरित आरोग्य केंद्रात नेण्यासाठी बुलढाणा येथे अडचणीचा गिरडा घाटाचा रस्ता खडतर असल्याने अडचण येते.तरी सुद्धा जीव मुठीत अनेकांना यासाठी किरायाच्या स्वतंत्र खासगी वाहनातून रुग्णांना घेऊन जाणे जावे लागते. गरीब रुग्णाची आर्थिक परिस्थिती बेताची असल्यामुळे त्यांना बुलढाणा येथे खर्चित परवडत नाही. जर सावळदबारा येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला सर्व सुख सुविधा कर्मचारी पुरवल्यास बुलढाणा येथे जाण्याचा प्रश्न च उद्‌भवणार नाही.

सावळदबारा या गावाचे परिसरातील गावांचे अंतर कमी असल्याने या सर्व गावांपासून प्राथमिक आरोग्य केंद्र हे हाकेच्या अंतरावर आहे. सावळदबारा पासून या परिसरातील गावांचे अंतर १० ते १२ किलोमीटर असून ते ताबडतोब सुरू करावे व या प्राथमिक आरोग्य रुग्णांना ताबडतोब सेवा मिळेल. जर हे प्राथमिक आरोग्य केंद्र सुरू करण्यात आले नाहीत तरजिल्हा परिषद औरंगाबाद मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे रितसर न्याय मागणार असल्याचे प्रा जीवन कोलते यांनी सांगितले आहे. असे केंद्रावर २० गावांचा भार आहे. ग्रामस्थांचे म्हणणे आहे.20 हजार नागरिकांच्या आरोग्याची जबाबदारी या आरोग्य केंद्रावर आहे. एवढ्या मोठ्या लोकसंख्येच्या भागात प्राथमिक आरोग्य केंद्र असल्यामुळे रुग्णांचे हाल होतात. सावळदबारा परिसरातील रुग्णांनी सांगितले. लवकरच ग्रामस्थ जी प मुख्यकार्यकारी अधिकारी साहेब छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे सावळदबारा येथे नव्याने बांधण्यात आलेल्या इमारतमधे प्राथमिक आरोग्य केंद्र लवकरात लवकर सुरू करण्यात यावे, अशी मागणी ग्रामस्थांनी व प्रा जीवन कोलते पाटील सामाजिक कार्यकर्ते यांनी केली आहे.

# पस्तीस ट्रिलीयन अर्थव्यवस्थेसाठी नियोजन महत्वाचे

## 'आयसीएआय'चे राष्ट्रीय अध्यक्ष सीए अनिकेत तलाठी यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** सनदी लेखापाल घडवणारी 'आयसीएआय' संस्था पंचाहत्तराव्या वर्षात पदार्पण करत असून, सध्या भारताची अर्थव्यवस्था साडेतीन ट्रिलीयन इतकी आहे. संस्था शताब्दी महोत्सव साजरा करतेवेळी म्हणजे २०४९ मध्ये भारतीय अर्थव्यवस्था ३५ ट्रिलीयनची होईल, असा अंदाज आहे. त्यावेळी गरज असलेली सीएंची संख्या, गुणवत्ता आणि दर्जा याचा अंदाज बांधून आतापासूनच नियोजन महत्वाचे असून, त्यादृष्टीने आम्ही पायाभरणी करत आहोत," असे प्रतिपादन दी इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाऊंटन्ट्स ऑफ इंडियाचे ( आयसीएआय ) राष्ट्रीय अध्यक्ष सीए अनिकेत तलाठी यांनी केले.

पुणे आयसीएआयच्या वतीने आयोजित संवाद कार्यक्रमात सीए तलाठी बोलत होते. बिबवेवाडी येथील आयसीएआय भवन येथे झालेल्या कार्यक्रमावेळी आयसीएआयच्या केंद्रीय समितीचे सदस्य सदस्य सीए चंद्रशेखर चितळे, पुणे आयसीएआयचे अध्यक्ष सीए राजेश अग्रवाल, उपाध्यक्षा सीए अमृता कुलकर्णी, सचिव सीए अजिंक्य रणदिवे, खजिनदार सीए हृषीकेश बडवे, कार्यकारिणी सदस्य सीए काशिनाथ पठारे, सीए सचिन मिनियार, सीए प्रणव आपटे, सीए प्रितेश मुनोत आदी उपस्थित होते. सीएच्या प्रस्तावित नव्या अभ्यासक्रमाविषयी बोलताना सीए तलाठी म्हणाले, "सीएंचा व्यवसाय केवळ अकाउंटींग आणि ऑडिटींगपुरता मर्यादित न राहता तो व्यापक बनला आहे. त्यासाठी विविध नवे कायदे, सॅप, इआरपी, एआय, ब्लॉकचेनसारखे तंत्रज्ञान आत्मसात करावे लागते. त्यामुळे अभ्यासक्रमात बदल करून 'सेल्फ पेस लर्निंग मॉडेल' तयार करण्यात येत आहे. तंत्रज्ञानामुळे सीएची परीक्षा पास झाल्याच्या दिवशीच विद्यार्थ्यांना ऑनलाईन सदस्यत्व प्राप्त करणे शक्य झाले असून इन्स्टिट्यूटच्या इतरही सुविधा तातडीने मिळवता येतात. भोपाळ, औरंगाबाद, बडोदा यासारख्या शहरांतून पहिल्यांदाच केंद्रीय समितीमध्ये सदस्यांचा समावेश झाला आहे. इन्स्टिट्यूटच्या विस्ताराचे हे द्योतक आहे. या विस्तारासाठी पूरक आणि काळाची गरज असलेल्या ऑनलाईन, डिजिटल आणि आंतरराष्ट्रीय दर्जाच्या मानकांचा अंगीकारही करण्याची गरज आहे," असे तलाठी यांनी नमूद केले.

सीए चंद्रशेखर चितळे यांनी वर्ल्ड काँग्रेस ऑफ अकाउंटन्ट्स झाल्यानंतर जगाचा 'आयसीएआय'कडे बघण्याचा दृष्टीकोन बदलल्याचे सांगितले. सिंगापूर असोसिएशन ऑफ चार्टर्ड अकाउंटन्ट्स या संस्थेने तिथे चार्टर्ड अकाउन्टन्सीची प्रॅक्टिस करण्यासाठीचे नियम एकदम शिथिल करण्याचा निर्णय सकारात्मक असल्याचे चितळे म्हणाले. सीए राजेश अग्रवाल यांनी स्वागत मनोगत व्यक्त केले. सीए अजिंक्य रणदिवे यांनी प्रास्ताविकात पुणे शाखेने दहा हजार सदस्यांचा टप्पा गाठल्याचे सांगत इन्स्टिट्यूटची मूलभूत माहिती दिली. सीए हृषीकेश बडवे यांनी सूत्रसंचालन केले. सीए अमृता कुलकर्णी यांनी आभार मानले.





















# बारसू का पेटले..?



जयेश अर्जुन माधव
संपर्क 9167710614

आधुनिक केसरी

**गेल्या काही दिवसात कोकणात बारसू रिफायनरी विरोधकांनी अख्खा परिसर दणाणून सोडला. कोकणात विनाशकारी रिफायनरी येताच कामा नये यासाठी प्रचंड आंदोलन झाले. पोलिसांनी संपूर्ण परिसर वेढून टाकला होता. आंदोलन करणारे सर्व स्थानिक गावकरी होते पण ते बाहेरून आल्याचे सांगण्यात येत होते. सरकार प्रशासन आणि प्रकल्पग्रस्त असा हा टोकाचा विरोध होता. काही जण कोकणवासीयांना विकास नको आहे असं म्हणत होते पण कोकण वासियांच्या विकासाची कल्पना खूप वेगळी आहे हे सरकारने ध्यानात घ्यायला हवे. रिफायनरी ही कोकणच्या विकासासाठी असल्याचे सांगितले जाते पण ही रिफायनरी फक्त राजकारण्यांसाठी आहे हे अनेकदा स्पष्ट झालेले आहे.**

वातावरण तापल की शांत राहायचं आणि पुन्हा अचानक विषय पेटवायचा हे आता नित्या तेच झाले आहे. सतत रिफायनरीला विरोध करणारे पत्रकार वारीशे यांचा खून झाला आणि प्रकरण पुन्हा चिघळले वाटत असतानाच काही दिवस शांततेत गेले आणि पुन्हा अचानक बारसूत पोलीस फौजफाटा दिसू लागतात गावकरी सतर्क झाले. रिफायनरी किंवा रासायनिक प्रकल्प कोकणात येताच काम नाही असे तरुणांमध्येही दिसून येत आहे कोकणातला तरुण आता सुशिक्षित आहे. चांगले वाईट त्याला कळू लागले आहे. राजकारणी जरी सत्यानाशी असले तरी आजचा तरुण हा पर्याय पर्यावरणवादी असल्याचे दिसून येत आहे. कुठलाही प्रकल्प सरकार लोकांवर लागू शकत नाही. स्थानिकांचा विरोध असेल तर त्या प्रकल्पाचे चांगले आणि वाईट परिणाम स्थानिकांना समजावून सांगायला हवे कारण वाईट परिणाम तेथील स्थानिकांना वर्षानूवर्षे सोसावे लागणार आहेत. माहुल रिफायनरीचे दुष्परिणाम आता 30 वर्षानंतर तेथील स्थानिकांना जाणवू लागले आहेत त्यामुळे कोकणातील लोक सतर्क झाले आहेत. अनेक रासायनिक आणि पर्यावरण विरोधी प्रकल्पांचा कोकणी जनतेने या अगोदरही विरोध केला आहे. बारसूच्या विरोधात तरुणांसोबत घरातील म्हातारी शितारी माणसेही उतरलेली दिसून येत आहेत. हा लढा आमच्या मुलाबाळांसाठी लढत असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

कोकणची स्वतःची अशी एक निसर्गावर आधारित जीवनशैली आहे. शहरी विकास हा त्या जीवन पद्धतीत बसत नाही. कोकणी माणूस गावातील आपलं घर, आपली जमीन, आपली जनावरे आणि आपली माणसे जिवापाड सांभाळतो. एक वेळ उपाशी राहिल पण कोणाला बोलणार नाही. उगाचच कर्जबाजारी होऊन मनस्ताप करून घेणार नाही. जे मिळतं त्या समाधानाने राहू पाहतो. सुख आणि समाधान तो पैशात शोधत नाही तर सुख आणि समाधान तो जगण्यातून अनुभवतो. त्यामुळे आपल्या जीवापाड जपलेल्या जमिनीवर तो निस्सिम प्रेम करतो. त्यावर वाईट नजर पडलेली तो खपवून घेणार नाही. राजकारणी लोकांना विकास नको आहे त्यांना हवी आहे जमीन आणि अशा प्रकल्पातून मिळणारा अतोनात पैसा. विकास, नोकऱ्या हे ढोंग आहे. ज्याला जे योग्य आहे त्याला तेच द्यायला हवे. हे यांना कधी समजणार..? कोकणाने आपला निसर्ग अजूनही जपला आहे. त्याचे वाळवंट करणारे प्रकल्प कोकणातील लोक कसे खपवून घेतील? कोकणातील दोडामार्ग येथील एका गावातील गावकऱ्यांनी एमआयडीसी साठी स्वतःच्या जमिनी देऊन स्वतः एमआयडीसी साठी प्रस्ताव मांडला पण अजूनही त्या जागेवर एकही प्रकल्प येऊ घातलेला नाही ही राजकारण्यांची नीतिमत्ता आहे. ज्या ठिकाणी यांना काहीतरी मिळेल त्याच ठिकाणी गरज नसताना नको ते उद्योग आणायचे घाट घालतील त्यामुळे राजकारणी लोकांवरचा विश्वास ढळत चालला आहे.

नाणार येथून लोकांनी हा प्रकल्प लढून हद्दपार केला आणि ग्रीन रिफायनरी करून तो पुन्हा बारसूत आला. ग्रीन रिफायनरी हा शब्द कोणी आणला तेच समजत नाही. ग्रीन रिफायनरी म्हणजे नेमकी कसली रिफायनरी श? हे अद्याप पर्यंत सरकारने स्पष्ट केलेले नाही. रासायनिक उद्योग ग्रीन कसे काय असू शकतात? हा प्रत्येकाला पडलेला प्रश्न आहे.

रिफाइनरीच्या समर्थनात जामनगर मध्ये सुद्धा आंब्याच्या बागा असल्याचे सांगितले जात आहे पण असे सांगणारे हे विसरत आहेत की अख्ख जग कोकणातला हापूस आंबा खात आहे. कोकणातल्या हापूस आंब्याची जागा जगातला कुठलाच आंबा घेऊ शकत नाही. रिफायनरीच्या समर्थनात अगदी तकलादु कारणे पुढे केली जात आहेत. रोजगार निर्मिती हे एक कारण दिले जात आहे पण कोकणी माणूस रोजगारासाठी हपापलेला नाही किंवा तो बेरोजगार आहे असेही नाही. आहे त्यात समाधान मानून जगणार आहे. एवढ्या मोठ्या रिफायनरीत आपल्याला नोकऱ्या मिळतील तरी कसल्या एकतर वॉचमेन नाहीतर



हाऊसकीपिंगच्या.. हे कोकणी माणसाने जाणले आहे. मुळशी पॅटर्न सिनेमाची निर्मिती ही अशाच प्रकरणातून झाली आहे भूमिपुत्र भिकेला लागल्याशिवाय राहणार नाही, हे वेगळं सांगायला नको. मोठमोठे प्रकल्प यायच्या आधीच तेथील जमिनी परराज्यातील लोकांनी खरेदी केलेल्या असतात हे काय गौड बंगाल आहे हे कोणालाच कळत नाही. स्थानिकांना माहिती नसते इथे कुठला प्रकल्प येणार आहे किंवा नाही पण त्या परिसरातील जागा मात्र परराज्यातील व्यक्तींकडून खरेदी केलेल्या असतात. बारसूला ही हेच झाले आहे. स्थानिकांना काही कळायच्या आत परराज्यातील व्यक्तींनी तेथील जागा विकत घेतल्याचे दिसून येत आहे. कोकणाला विकास नको आहे का? नक्कीच हवा आहे!! पण कोकणाला असा लादलेला विकास नको आहे. कोकणाला हवा आहे शाश्वत विकास. कोकण हा प्रदेश फळाफुलांनी आणि नैसर्गिक सौंदर्याने फुललेल्या प्रदेश आहे. या ठिकाणी फलोद्यान प्रकल्प, फूड पार्क, फळ प्रक्रिया केंद्र, माशावर प्रक्रिया करणारे उद्योग, पर्यावरणाला धोका नसणारे उद्योग या ठिकाणी यायला काय हरकत आहे? गोवा अख्ख राज्य पर्यटनावर चालते. गोव्याच्या तोडीचा निसर्ग कोकणात आहे. कोकणात पर्यटनावर आधारित उद्योग का येत नाहीत? सिंधुदुर्ग हा जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून जाहीर झाल्यावर आता तीस वर्षे झाली या 30 वर्षात काय विशेष प्रयत्न केले गेले? हे न समजायला आता कोकणी माणूस अडाणी राहिलेला नाही.

कोकणातील मुले अलीकडे दरवर्षी बोर्डात अव्वल येत असतात. शैक्षणिक क्षेत्रात कोकणात चांगल्या संधी निर्माण करता येऊ शकतील. कोकणात आयटी पार्क का निर्माण होऊ शकत नाहीत? कोकणात अजूनही चांगल्या हॉस्पिटलची वानवा आहे. हे राजकारण्यांना दिसत नाही का? फक्त नको त्या प्रकल्पांना रेटत चालले आहेत. चांगले प्रकल्प दुसऱ्या राज्यांना आंदण म्हणून देऊन टाकायचे आणि आपल्या जनतेच्या माथी मात्र विष मारायचं हे किती दिवस चालणार आहे? नाणार प्रकल्पाला शिवसेना (उ.बा.ठा) यांचा विरोध होता. शिवसेना प्रकल्पग्रस्तांच्या पाठी उभी राहिली पण त्यांनी बारसूचा पर्याय सुचवला हे न समजणारे आहे. आता बारसूत विरोध होतो आहे हे पाहून पुन्हा प्रकल्पग्रस्तांच्या पाठी उभे राहू पाहत आहे. शिवसेनेला जर खरोखरच कोकणी माणसाच्या पाठी उभे राहायचे असेल तर संपूर्ण कोकणात कुठेही रासायनिक प्रकल्प किंवा पर्यावरण विरोधी प्रकल्प येऊ देणार नाही यावर ठाम राहायला हवे. ते होताना दिसत मात्र नाही कारण तळ कोकणात मायनिंग वाल्यांनी पोखरायला सुरुवात केली आहे. तिकडे अनेक आंदोलने उभी राहिली पण शिवसेना तेव्हा मागे राहिली. शिवसेनेला ठाम भूमिका घेऊनच कोकण वासियांच्या समोर यायला हवे. तरच कोकणातील जनता विश्वास ठेवेल. प्रकल्पग्रस्त हे कालांतराने देशोधडीलाच लागतात हा आजवरचा ईतिहास आहे. हे सरकारने लक्षात घ्यायला हवे. अगोदर प्रकल्पग्रस्तांना न्याय आणि नंतर प्रकल्प हे धोरण सरकारने राबवायला हवे नाहीतर प्रत्येक वेळी एक नवे नाणार आणि नवे बरसू जन्माला येणार आहे.

# महाराष्ट्र माझा



संगीता ठलाल
७८२१८९६४८५

आधुनिक केसरी

**आज १ मे,म्हणजेच महाराष्ट्र दिन त्या निमित्ताने सर्व बंधू, भगिणींना महाराष्ट्र दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा जग हा कितीही मोठा असेल तरी या जगात, माझ्या भारत देशात तसेच अनेक राज्यात माझ्या महाराष्ट्र राज्याला कोणी ओळखत नाही असं होऊ शकत नाही.**

खास करुन माझ्या महाराष्ट्र राज्याची ओळख आहे ती म्हणजेच होऊन गेलेले थोर संत, महात्मे, महापुरुष त्याच प्रमाणे अखंड हिंदुस्थानाचे आराध्य दैवत, हिंदवी स्वराज्याचे संस्थापक ,रयतेचा राजा श्री. छत्रपती शिवाजी महाराज यांच्यामुळेच मी सर्व महाविभूतींना कोटी, कोटी विनम्र अभिवादन करते. आज राजेंमुळे या जगात महाराष्ट्र राज्याची विशेष ओळख आहे. मी ,स्वतःला खूप भाग्यवान समजते की, महाराष्ट्र राज्य सारख्या पावण व पवित्र अशा भूमीत माझा जन्म झाला. त्या, भूमातेला मी वंदन करते माझ्या महाराष्ट्रात असलेली संस्कृती व इथे होणारे सण, उत्सव हे, जगापेक्षा वेगळे आहेत माझ्या महाराष्ट्रात कशाचीही कमी नाही. खास करून माझ्या महाराष्ट्रात अनेक किल्हे आहेत ते सर्व किल्हे शुरवीर, चतुर असलेले मुठभर मावळे सोबतीला घेऊन मोठ्या कष्टाने माझ्या छत्रपती शिवाजी महाराजांनी अनेक किल्हे जिंकून दिले व रयतेला शत्रूपासून मुक्त केले आजही इतिहास साक्षी आहे ते, सर्व पराक्रम माझ्या महाराजांनी तसेच माझ्या मावळ्यांनी करुन दाखवले आहेत.



आज ते अजरामर होऊन गेले आहेत.माझ्या महाराष्ट्रात शंभूराजे,जन्मले, थोर संत ज्ञानेश्वर माऊली, जगदगुरु तुकाराम महाराज, नामदेव महाराज, संत चोखामेळा, संत गोरोबाकाका, संत नरहरी महाराज, संत सावता माळी, संत जनाबाई, संत मुक्ताबाई, संत सखुबाई, संत कान्होपात्रा, राजमाता जिजाऊ, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, ताराबाई, रमाई, कर्मयोगी संत गाडगेबाबा,मानवतेचे पुजारी वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले, क्रांतिज्योती सावित्रीआई फुले, शाहू महाराज, अनाथांची माय सिंधुताई सपकाळ, वं. बाबा आमटे, बहिणाबाई चौधरी, हदयसम्राट बाळासाहेब ठाकरे, क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके,नेते तसेच अनेक महाविभूती व कवी, कवयित्री, लेखक, लेखिका, साहित्यिक,गायक, गीतकार,चित्रकार, जन्मले,थोर समाजसुधारक याच मातीतून घडून गेले आणि अजरामर झाले. आज त्यांच्या संदेशातून, मार्गदर्शनातून, अभंगातून, मला खूप काही शिकायला मिळत असते. माझ्या महाराष्ट्रात अनेक पर्यटन स्थळे आहेत, अनेक तलाव,धरणे आहेत, लोहखनिजांच्या व दगडी कोळशाच्या खदाणी आहेत, माझ्या महाराष्ट्रात गोदावरी, वैनगंगा, प्राणहिता नावाजलेल्या नद्या आहेत,माझ्या महाराष्ट्राशी जुळून असलेले माझे नाते हे वेगळे आहेत, माझ्या महाराष्ट्रात खास करून मराठी भाषा बोलली जाते त्या,सोबत झाडीबोली, वऱ्हाडी,ऐरानी गोंडी, व अनेक भाषा बोलल्या जातात.माझी मराठी भाषा अनेक देशात, विदेशात तसेच अनेक राज्यात राहणाऱ्या लोकांना खूप आवडते.तसेच आजही गावागावात भजन कीर्तनाचे आयोजन केले जाते, सर्व मिळून महाप्रसाद बणवतात व मिळून, मिसळून खातात,माझ्या या मातीशी जुळलेले नाते कधीच न तुटणारे आहेत माझा महाराष्ट माझ्या साठी सर्वश्व आहे. याच माझ्या मातीत नागपूर येथे पवित्र अशी दिक्षाभूमी आहे तसेच बारा ज्योतिर्लिंग पैकी तीन ज्योतिर्लिंग आहेत, देविचे साडेतीन शक्तीपीठ आहेत, माझ्या महाराष्ट्रात सर्वाचा लाडका देव चंद्रभागेच्या तिरी युगे अठ्ठावीस वर्ष उभा असलेला विठूराया आहे, देवशयनी आषाढी एकादशी, कार्तिक एकादशी ला भक्ताचा मेळा भरतो बघून जीवन धन्य झाल्यासारखे वाटते.

माझ्या महाराष्ट्राची पुरणपोळी प्रसिद्ध आहे मी, प्रत्येक सणाला आवर्जून बणवत असते, त्याच प्रमाणे माझ्या महाराष्ट्रात असलेला गडचिरोली आदिवासी जिल्हा आहे तेथे वडसा (देसाईगंज) या शहराची खास ओळख आहे ती म्हणजेच झाडीपट्टी रंगभूमी म्हणून अनेक तेथे प्रेस आहेत चार महिने लगातार कंपनीच्या नाटकांचे आयोजन केले जाते, बरेच नाट्यकलावंत सुद्धा घडून गेले आहेत आणि आजही घडत आहेत. सोबतच ताडोबा,कोका या, नावाने प्रसिद्ध असलेले अभयारण्य, आहेत बरेच लोक वाघ बघण्यासाठी दूरून येत असतात. माझ्या महाराष्ट्रात अनेक जातीधर्माचे लोक आहेत काही गावागावात देऊळ, मशिद, बुध्द विहार, आहेत. हेमलकसा लोक बिरादरीची ओळख आहे, सोबतच माझ्या महाराष्ट्रात राहणारे लोक एकमेकांना वेळप्रसंगी मदत करतात, मुंबई हि महाराष्ट्र राज्याची राजधानी आहे तिला स्वप्ननगरी म्हणून ओळखल्या जाते. अनेक राज्यातील कलावंत तेथे येतात व त्यांना रोजी रोटि मिळते, याच मातीत माझा बळराजा आहे भात पिकवतो व अनेक पिक काढतो. माझा महाराष्ट्र सर्वगुणसंपन्न आहे माझ्या महाराष्ट्राचि किती गाऊ वाणी किती करु गुणगान या मातिने मला जगायला शिकवले, रहायला जागा दिले, खायला अन्न देत आहे सोबत ओळख दिली पुन्हा मला काय हवं..? जीवन धन्य झाल्यासारखे वाटते अजून लिहिण्यासारखे खूप काही आहे एवढं सारं माझ्या महाराष्ट्रात आहे. म्हणून मला अभिमानाने आदरणीय कविच्या दोन ओळीतून म्हणावेसे वाटते की,

**जय,जय महाराष्ट्र माझा**
**गर्जा महाराष्ट्र माझा**

# संस्कृतीचे अस्तित्व टिकण्यासाठी भाषा टिकली पाहिजे

आधुनिक केसरी

संस्कृती आणि बोलीभाषा यांचा परस्परांवर प्रचंड मोठा प्रभाव पडत असतो. संस्कृती टिकली तर भाषा टिकते आणि भाषा टिकली तर संस्कृती टिकते. आपल्या बोलीचा भाषेचा अभिमान हा सगळ्यांनाच असतो. भाषेच महत्व हे जीवनात अनन्यसाधारण असच असत. आपली बोली मातृभाषा हि आपल्याला उत्तमपणे उत्कृष्ट पद्धतीने बोलता आली पाहिजे समजली व उमजली पाहिजे. आपण जी भाषा बोलतो जाणतो समजतो त्या भाषेला राजभाषेचा दर्जा मिळालाच पाहिजे हि ती भाषा बोलणाऱ्या प्रत्येक नागरिकाची मनोमन इच्छा असते. तशी इच्छा असण्यात गैर असं कांहीच नाही. मराठी हि महाराष्ट्र राज्यातील राजभाषा हा आहे हि आपल्या सगळ्यांसाठी अभिमानाची बाब तर आहेच पण आपली भाषा टिकवणे संवर्धन करणे हि जबाबदारी पण आहे. संस्कृती वर आक्रमण झाल कि भाषा आपोआप बदलत असते. भाषेच रक्षण करण्यासाठी संस्कृतीच रक्षण करावच लागत. हजारो वर्षा पासुन अनेक परकिय आक्रमणाला तोंड देत मराठी संस्कृती ने आपलं अस्तित्व टिकवल आणि म्हणून आपली भाषा पण टिकली. प्राचिन भारतीय संस्कृती मधील काही महत्वाच्या भाषांपैकी मराठी हि महत्वाची लोकप्रिय व प्राचिन भाषा असुन अगदी देवनागरी ते मराठी हा रंजक प्रवास त्या संस्कृती टिकवत असताना दिवसेंदिवस निर्माण होत असलेली शुद्धता हि देखिल कौतुकास्पद बाब आहे. मराठी हि आपली बोलीभाषा तर आहेच पण महाराष्ट्र राज्याची राजभाषा सुद्धा आहे. महाराष्ट्र राज्याची राजभाषा असली तरही इतर काही राज्यातील अनेक लोक सुद्धा हि भाषा बोलतात ती राज्य ज्या मध्ये गोवा, मध्यप्रदेश, गुजरात, तेलंगणा, आंध्रप्रदेश या राज्यांचा समावेश आहे. याठिकाणी बरेच लोक आपल्याला मराठी बोलणारे दिसतील. एंकदरीत मराठी भाषा बोलणारया लोकांच्या संख्येचा विचार केला तर देशात चौथा व जगातीक पातळीवर पंधरावा क्रमांक मराठी भाषेचा लागतो. भाषा हि संवादाचं माध्यम असल्याने त्या त्या बोली भाषेला समजणारे जणणारे लोक यांचा मिळुन एक विभाग अथवा प्रांत तयार होतो. भाषा हि त्या त्या प्रतांचा विभागाच प्रतिनिधीत्व करत असते. संस्कृती जितकी प्राचिन तितकीच भाषा देखील प्राचिन असते. संस्कृती टिकण्यासाठी भाषा टिकली पाहिजे. कारण भाषा हि संस्कृतीच अस्तित्व असते. सर्व सामान्य माणसंच भाषेला जन्म देत असतात. आणि ती भाषा वृद्धिंगत करत टिकवत असतात. मुळात भाषा शुद्ध अशुद्ध वगैरे असं काही नसतं. आपल्या संस्कृतीच सहज दर्शन आणि मनातील मुक्त भाव भाषेच्या माध्यमातून व्यक्त होत असतात. आपली संस्कृतीच संवर्धन व जतन करण्यासाठी आपली भाषा आपण टिकवली पाहिजे. भाषेचा जन्म हा सर्व सामान्य माणसाच्या मनातील सहज भाव व्यक्त होत असताना भाषेचा जन्म होत असतो. वेगवेगळ्या संस्कृती मध्ये जन्माला आलेली सर्व साधारण माणसं आपलं दैनंदिन जीवन जगताना आपल्या मनातील मुक्त भाव मनसोक्तपणे विशाद करताना भाषेचा जन्म होत असतो. भाषा हि ठरवुन जन्मला येत नाही. प्रत्येक व्यक्तीला आपल्या मातृभाषेचा अभिमान स्वाभिमान असतोच नव्हे तो असलाच पाहिजे. पण याचा इतर इतर भाषा बदल अनादर असणं असा होत नाही. आपली मातृ भाषा टिकवत असताना इतर भाषा पण समजुन जाणुन घेतल्या पाहिजेत. संस्कृती बदली तर भाषा आपोआप बदलते. म्हणून आपण आपली भाषा जपली पाहिजे टिकवली पाहिजे. तीच संवर्धन व रक्षण केलं पाहिजे. जेणेकरून आपली संस्कृती मजबूत होण्यासाठी उपयोगी ठरेल.



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301




**(लेखक संस्थापक अध्यक्ष वंजारी महासंघ महाराष्ट्र राज्य तथा वंजारी समाज ईतिहास अभ्यासक व लेखक बालसंस्कार शिबिर अध्यात्मिक मार्गदर्शक आहेत.)**

# अभीष्टचिंतन दिन (वाढदिवस) म्हणजे नवसंकल्प दिवस !



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**एक काळ असा होता की; ज्याचा त्याला सुद्धा वाढदिवस किंवा लग्नाचा वाढदिवस माहिती नसायचा. समस्या, अडचणी, कामंच एवढी असायची, त्यामुळे वाढदिवस हा विषयच नसायचा. एखाद्या महापुरुषांची जयंती किंवा पुण्यतिथी एवढंच काय ते माहित व्हायचं! कोणताही विशेष दिवस साजरा न करता सगळे आनंदी असायचे. लेकरं-बाळ-माणसांनी घर, गुराढोरांनी गोठा, भाकरींनी टोपलं भरलेलं असायचं. परंतु अलीकडच्या दहा-वीस वर्षात सगळं काही झपाट्यानं बदललं. उत्पन्न वाढलं. माणसं विखुरली. गुरं-ढोरं-गोठा गायब झाला. घरातली पोथी-पारावरचं भजन बंद झालं! कुटुंब विभक्त होऊन घरातील बुजुर्ग माणसं गायब झाली. माणसांची जागा वेगवेगळ्या साधनांनी घेतली.**

टेलिफोन, रेडीओ, कृष्णधवल टीव्ही, रंगीत टीव्ही असे बदल होत होत साधा मोबाईल अन शेवटी कळस म्हणजे इंटरनेटसह स्क्रीन टच अँड्रॉइड मोबाईल आला आणि सगळच बदललं! 'करलो दुनिया मुठ्ठी में' ने सगळीकडे हाहाःकार माजवला. माणसातला माणूस उठून गेला. पत्र लिहिणारा, पुस्तक वाचणारा, माणसांत बसून हसत-खेळत गप्पा मारणारा, मैदानावर खेळ खेळणारा, निवांत वेळ काढून नातेवाईकांकडे जाऊन राहणारा स्वछंदी-आनंदी-मुक्त माणूस बंदिस्त झाला. एकाकी झाला. तासंतास एकटाच मोबाईल नावाच्या निर्जीव यंत्रांशी खेळू लागला. मोबाईलवरील फेसबुक, व्हॉट्सॲप, इंस्टाग्राम इत्यादी विविध एप्सने माणूस आणखीच एकटा झाला. माणसाने निर्माण केलेला मोबाईल माणसाला हाताळायला लागला आणि सुरु झाला मेसेज, चॅटिंगचा जीवघेणा खेळ! इथेच माणसांचा आणि माणसांच्या लग्नाच्या वाढदिवसाचा जन्म झाला! मी हा लेख का लिहितोय? त्याचेही कारण आज १ मे, माझा पक्का माहित नसलेला, गुरुजींनी त्यांच्या सोयीने टाकलेला वाढदिवस आणि उद्या आम्हाला (मी व माझी पत्नी सौ.विमल) पक्का माहित असलेला लग्नाचा वाढदिवस! वाढदिवस म्हणजे तरी काय हो? नवीन कपडे, केक, नाश्ता, जेवण, सेलिब्रेशन करणे म्हणजे वाढदिवस का? याचा अर्थ आपण सेलिब्रेशन करूच नये असे पण नाही, परंतु सेलिब्रेशन कशासाठी? आपण साजरा करतो आहोत तो वाढदिवस की घट दिवस? आजच्या दिवशी आपण सेलिब्रेशन शिवाय काय करायला हवे? असे एक ना अनेक प्रश्न पडतात. वाढदिवसाच्या संबंधाने मला अग्निसाक्षी चित्रपटातील नाना पाटेकरांचा एक मजेशीर डायलॉग आठवतो. वाढदिवसाची पार्टी, गोंधळ-गोंगाट सुरु असतो, त्या दरम्यान नाना येतो आणि सुरु असलेले लाउडस्पीकर पिस्तुलातील गोळी झाडून बंद करतो आणि म्हणतो, "जनम दिन मना रहे हो, अछी बात है. मगर इतना शोर क्यों मचा रहे हो भाई? ऐसा क्या तीर मारा है आपने पिछले ३६५ दिनों में?" अत्यंत महत्वाचा डायलॉग वाटतो हा. आपण वाढदिवस नाही तर घट दिवस साजरा करत असतो! एक महत्वपूर्ण वर्ष, मिळालेल्या सुंदर, अलौकिक जीवनातील ३६५ दिवसाचा एक टप्पा पार करून आपण पुढे आलो आहोत! या मागील ३६५ दिवसांत आपण असे कोणते महत्वपूर्ण कार्य किंवा उपक्रम केले? आपल्याकडून समाजाची, देशाची, साहित्याची अथवा अन्य काही सेवा घडली का? आपण या अगोदरच्या वर्षापेक्षा या वर्षात काय काय नवीन कार्य केले? आपल्यामध्ये मागील वर्षाच्या तुलनेत या ३६५ दिवसांत कोणते संकल्प केले होते आणि त्यापैकी किती संकल्प आपण तडीस नेले? असे एक ना अनेक संकल्प अथवा कार्य आपण केले याचा लेखाजोखा अथवा आढावा घेणे म्हणजेच खऱ्या अर्थाने वाढदिवस साजरा करण्यास समर्थ होणे होय!

सगळीकडे वाढदिवस-एनिव्हर्सरीची धामधूम सुरु आहे. मिडीयावर सगळीकडे वाढदिवस आणि एनिव्हर्सरीचे पोस्टर्स झळकत असतात. सर्वत्र शुभेच्छाचा वर्षाव सुरु आहे. निश्चितपणे ही आनंदाची बाब आहे. मात्र त्यामागील विचार आणि आचार सुद्धा समाजाने समजून घेणे गरजेचे वाटते. सगळीकडे




साधनाची रेलचेल असतांना एखादे सेलिब्रेशन करण्याच्या नादात आपण व्यसन, अनावश्यक फॅशन आणि खर्चाचे बळी तर पडत नाहीत ना? वाढदिवस नावाखाली युवा पिढी वाममार्गाला तर जात नाही ना? असे एक ना अनेक प्रश्न पडताहेत. आज युवा पिढी जागृत होणे काळाची गरज आहे. सगळीकडे युवकांचे बेधुंद तांडे झुंडी-झुंडीने वाढदिवस साजरे करत आहेत. व्यसन केले जात आहे. पार्ट्या झडताहेत. गरीब घरची मुले देखील या पार्टी-उच्चभ्रू-उनाड संस्कृतीचे बळी ठरत आहेत. याला कुठेतरी आळा बसने अत्यावश्यक वाटते. हे प्रमाण कमी होऊन युवकांनी आपला वाढदिवस काहीतरी नवे संकल्प करून अथवा काहीतरी नवनिर्मितीची शपथ घेऊन साजरा करायला हवा!

बंधू-भगिनीनो, आपल्या अनमोल जीवनातील एकएक दिवस आपण कमी करत आहोत. एकएक दिवस आपण मृत्युच्या जवळ जात आहोत. त्यासाठी आपल्याला मिळालेला अनमोल मानवदेह, आयुष्य आपण स्वतःचे उत्थान करून घेण्यासाठी उपयोगात आणावा लागेल! याच अनुषंगाने जगद्गुरू तुकोबाराय एका अभंगात लिहितात,

**घडीघडी काळ वाट त्याची पाहे ।**
**अजुनी किती आहे अवकाश ।।**
**हाची अनुताप घेऊनि सावध ।**
**काही तरी बोध करी मना ।।**

याचा नक्की विचार झाला पाहिजे. आज वाढदिवस वेड एवढे वाढले आहे की; काही पैसेवाले, एखाद्या पदावर असलेली माणसे लोकांना प्रलोभन दाखवून लेख लिहून घेत आहेत. काहीतरी सामाजिक-राजकीय-शैक्षणिक-साहित्यिक-सांस्कृतिक योगदान असल्याशिवाय लेख लिहून घेणे अथवा लिहिणे म्हणजे एकप्रकारची भाटगिरी करून घेणे अथवा करणे होय! हे सुद्धा कुठेतरी थांबले पाहिजे. आज माझ्या वाढदिवसाच्या निमित्ताने मीच हा लेख लिहित आहे. मागील वाढदिवशी मी विविध विषयांवर ५० लेख लिहायचा, केवळ जाण्यायेण्याच्या खर्चात, विनामुल्य १० ते २० व्याख्याने आणि १० ते २० कीर्तने करण्याचा संकल्प केला होता आणि तो जवळपास मी पूर्ण केला आहे. मागील वर्षात मी ५० पेक्षा जास्त लेख लिहून २० पेक्षा अधिक व्याख्याने-कीर्तने केली आहेत. असे असले तरी आज रोजी माझ्या वयाची ४८ वर्षे संपली आहेत आणि मी ४९ व्या वर्षात पदार्पण करतो आहे. अनेक आप्तेष्ट, सहकारी, मित्र, विद्यार्थी, वाचक, लेखक, हितचिंतक मला आज शुभेच्छा देतील, त्या शुभेच्छाचा मी विनम्रतापूर्वक स्विकार करतो. यानिमित्ताने मी अपना सर्वांचा शतशः ऋणी असून मी करत असलेले जे काही छोटेसे कार्य आहे ते असेच इमाने-इतबारे पुढे नेण्याची मी आपणांस ग्वाही देतो. त्याशिवाय मी वर्षभर लोकांना योग-प्राणायामाचे मोफत धडे देईन. मी माझे अध्ययन-अध्यापनाचे, शैक्षणिक काम निष्ठेने पार पाडीन! वर्षभर मी कुणाशीही वितुष्ट येईल असे वागणार नाही. शांत राहून शांततेचा प्रसार-प्रचार करीन. मी नियमित ध्यान-योग-प्राणायाम करून इतरांना त्या संदर्भाने प्रोत्साहन देईन! अशाप्रकारे नेहमी मी माझा भोवताल नित्य आनंदी-निरोगी-हसतमुख ठेवण्यासाठी प्रयत्नरत राहीन! त्याचप्रमाणे आपणही काहीतरी संकल्प करून आपण जीवनातील प्रसंग साजरे करावेत अशी सह्रदयतापूर्वक विनंती करतो! शेवटी विनम्रपणे सर्वांप्रती मी माझे कृतज्ञ भाव प्रकट करतो! प्रणाम! धन्यवाद!

# स्मितहास्य: काय बरे रहस्य ?



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**दरवर्षी मे महिन्याच्या पहिल्या रविवारी जागतिक हास्य दिन साजरा करण्यात येतो. या दिवसाची सुरुवात मुंबईमधूनच झाली होती. हा दिवस सर्वात आधी दि.११ जानेवारी १९९८ रोजी डॉ.मदन कटारिया यांनी साजरा केला होता. दिवसभरात शेकडो देशांमध्ये मे महिन्याच्या पहिल्या रविवारी हा दिवस साजरा करण्यात येतो. हा दिवस साजरा करण्यामागील प्रमुख उद्देश म्हणजे लोकांना हसण्याच्या फायद्यांबाबत माहिती देणे व जागरूक करणे होय. हसणे आपल्या शरीरात आणि मनामध्ये उत्तेजन आणते आणि मनापासून हसणे एखाद्या औषधापेक्षा काही कमी नाही. हे एक उत्तम शक्तिवर्धक म्हणून कार्य करते. म्हणूनच आज आपल्या धावपळीच्या जीवनातील ताण तणावातून मुक्त होण्यासाठी विविध ठिकाणी ह्युमर क्लब सुरू केले आहेत.**

दरवर्षी जगामध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर मे महिन्याच्या पहिल्या रविवारी जागतिक हास्य दिन पाळला जातो. या दिवशी आनंद आणि आनंदाची सकारात्मक भावना प्रोत्साहित केली जाते. आपल्या शरीराच्या निरामयतेसाठीही हसण्याचे महत्त्व आहे. स्मितहास्य आपल्या मनावरील खुप मोठा ताण कमी करू शकतो. आनंदाची छानदार शोभीवंत झालर म्हणजे हास्य आहे. हसण्याने असाध्यातील असाध्य विकार दूर पळतात. हे कोरोनाच्या जीवघेण्या प्रादुर्भाव काळात सिद्ध झाले आहे. चरमसीमेवर पोचलेल्या रूग्णांना कोरोना केअर सेंटरमधील कर्तव्यनिष्ठ आरोग्यकर्मचाऱ्यांनी आनंदवर्धक व हास्य गोष्टी ऐकवल्या होत्या. त्यामुळे बरेचसे रूग्ण मृत्युच्या जबड्यातून सुटले, हे आश्चर्यच नाही का? म्हणून स्वतः हसा व इतरांनी हसवत रहा. हेच मानवी जीवनातील सुवर्ण क्षण आणि जन्माचे सार्थक समजा. हा एक अतिशय सुंदर, सामर्थ्यवान आणि सकारात्मक भावनांचा उत्कर्ष करण्यासाठी समर्पित दिवस आहे. तो उत्कर्ष हास्यामुळे टिकून राहतो. हा ताजी हवेचा श्वास आहे. कठिण परिस्थितित असताना आपल्या चिंतेपासून दूर जाण्यासाठी हसण्याशिवाय दुसरा कोणताही मार्ग नाही. हास्य खरेच एक उत्तम औषध आहे. हास्याचे महत्त्व प्रचंड आश्चर्यकारक आहे. आनंदी असणे निरोगी जीवनशैलीची गुरुकिल्ली आहे. हिंसा, तणाव, दहशतवाद, नैसर्गिक आपत्ती, खराब अर्थव्यवस्था आणि ग्लोबल वार्मिंग या सर्व गोष्टींमध्ये आनंदी राहण्याचा एकमेव मार्ग म्हणजे सुहास्यवदन असणे होय. जेव्हा लोक आनंदी आणि निरोगी असतात तेव्हा ते जागतिक शांततेत महत्त्वपूर्ण योगदानही देत असतात.

जागतिक हास्य दिन किंवा वर्ल्ड लाफ्टर डे दरवर्षी मे महिन्यात साजरा केला जातो. त्याची तारीख बदलते कारण हा दिवस मेमध्ये पडणाऱ्या पहिल्या रविवारी आयोजित केला गेला आहे. कोरोनाच्या दुसऱ्या लाटेने अनेक लोकांच्या चेहऱ्यावरील हास्य मावळले आहे. अशा परिस्थितीत लाफ्टर डेच्या बहाण्याने चेहऱ्यावर थोडे हास्य आणण्याचा प्रयत्न असतो. स्वतः हसा, तसेच इतरांना हसवा. हा एक दिवस लक्षातही येत नाही, म्हणून तो चांगला आठवडाभर पाळला जावा. या दिवसाची सुरुवात भारतातूनच तेही मुंबईत झाली आहे. याचे श्रेय लाफ्टर योग चळवळीचे संस्थापक डॉ.मदन कटारिया यांना जाते. त्यांनीच दि.११ जानेवारी १९९८ रोजी मुंबईत प्रथमच जागतिक हास्य दिन साजरा केला. ते विनोदी योग चळवळीचे संस्थापक होते. हा उत्सव साजरा करण्यामागील सर्वात मोठा हेतू म्हणजे समाजातील वाढते तणाव कमी करणे हा आहे. रोजच्या नित्यकर्मामुळे लोकांच्या आयुष्यात हसण्याचे प्रमाण खूप कमी होत आहे. अशा परिस्थितीत विचार केला गेला, की असे काहीतरी का करू नये? ज्यासाठी लोकांनी एकमेकांशी बोलावे आणि थोडावेळ हसत रहावे. सर्वात महत्वाची गोष्ट अशी आहे, की जेव्हा आपण हसतो तेव्हा आपल्या सभोवतालचे जग बदलते. बिनशर्त हसणे आपल्याला आतून बरे होण्याची शक्ती देते. जेव्हा आपल्याला आतून चांगले वाटते तेव्हा ते केवळ बाह्य जगाचा संपूर्ण दृष्टीकोन बदलतो. हसणे हा शारीरिक, मानसिक, सामाजिक आणि आध्यात्मिक कल्याणाचा सर्वात सोपा उपाय होय. यामुळे काहीच अपाय होत नाही, परंतु हास्यमुळे आपल्याला चांगले वाटते. आपले नाते मजबूत करण्यासाठी आणि जेव्हा आपण अस्वस्थ असतो तेव्हा वेगवेगळ्या परिस्थितीत हास्य हे आपल्या मदतीला असते. ते आपली चिंता कमी करते आणि ऊर्जा वाढवते. म्हणून हास्य हे उत्तम औषध आहे, जे प्रत्येक परिस्थितीत उपयुक्त ठरते. हास्य संपूर्ण शरीराला आराम देण्याचे कार्य करते व ते आपल्याला सर्व ताण तणावापासून दूर ठेवते, जे आपल्या स्नायूंना सुमारे ४५ मिनिटे विश्रांती देते. बोलताना जेवढे ऑक्सिजन घेतो, त्यापेक्षा सहापट जास्त ऑक्सिजन आपण हसण्यामधून घेतो. अशा प्रकारे शरीराला ऑक्सिजनची चांगली मात्रा मिळते. हसण्याने शरीरात मेलाटोनिन तयार होते, मेंदूने सोडलेल्या या हार्मोनमुळे चांगली झोप येते. जेव्हा आपण हसणे सुरू करतो तेव्हा शरीरात रक्ताभिसरण तीव्र होते. तणावात असताना जर आपण हसण्याचा प्रयत्न केल्यास दुःखही कमी होताना दिसते. आपली स्मरणशक्ती कालांतराने कमकुवत होत जाते, ती सुधारण्याचा एक मार्ग जो म्हणजे हास्य आहे. ते आपले मन मजबूत आणि स्मरणशक्ती चांगली ठेवते. हे आहेत हसण्याचे काही फायदे- हसण्यामुळे शरीराला एक प्रकारे ऊर्जा मिळते.

ब्लड प्रेशर कमी होऊन दुःख दूर करण्याचे कामही या हसण्यामुळे होते. चेहऱ्यावरील टवटवीतपणा कायम राहतो. शरीराची रोगप्रतिकार क्षमता व संसर्गासोबत लढणारी प्रणाली सक्षम होते. ज्यांना ह्रदयांचा आजार आहे, अशांसाठी हसणे हे फार उपयुक्त आहे. आपली गुणवत्ताही हसण्यामुळे वाढविता येते. हसणाऱ्या व्यक्तिच्या मनात नेहमी सकारात्मक विचार येतात. हसत राहिल्याने चांगले विचार येतात व वागणे सकारात्मक राहते. सदा हसरा चेहरा व हसविणारी अभिव्यक्ती सर्वांना हवीहवीशी वाटत असते. खुदूखुदू हसणे हे आनंदाच्या डोहातील आनंदतरंग होत.

आता तर योगा, प्राणायम या सोबतच हास्याचा सुद्धा समावेश योगांमध्ये करण्यात आला आहे. जसे की पैशात पैसा ओतला तर तो वाढतो, तसे ज्ञानदानाने ज्ञान आणि हास्यदानाने निरामय आरोग्यात चक्रवाढ व्याज दराने वृद्धी होते. दरम्यान आज जगभरात हास्ययोग घेतला जातो. अनेक ठिकाणी हास्ययोगाचे विशेष वर्ग चालतात. हास्ययोग लहानग्यांपासून वयोवृद्धांपर्यंत कोणीही करू शकतो. अतिशय कमी खर्चिक असा हा योगाचा प्रकार असल्यामुळे अनेकजण या योगाकडे वळले आहेत. हास्ययोगा केल्याने नकारात्मक विचार दूर जाऊन सकारात्मकतेचा विचार मनात येतो. फुफ्फुसाची कार्यक्षमता वाढते. हास्ययोगा केल्याने निखळ आनंद घेता येतो. दररोज १५ मिनिटापर्यंत हा योग करावा, असे तज्ञ सांगतात. विश्वातील काही देशात ५ ऑक्टोबरला जागतिक हास्य दिवस साजरा केला जातो. याच्यापाठीमागे एकच हेतू आहे हसा आणि दुसऱ्यांना हसवत राहा. आरोग्याच्या दृष्टीने हसणे किती उपयोगी आहे, हे वैद्यकीय शास्त्राने देखील मान्य केले आहे, हे येथे विशेष उल्लेखनीय!

!! हास्य दिन सप्ताहाच्या सर्वांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

# शूरवीर येसाजी कंक

आधुनिक केसरी

येसाजी वेलवंड खोऱ्याचे प्रतिष्ठित देशमुख होते. शिवाजीराजे तसेच शंभूराजेंचे जवळचे सहकारी होते. शिवाजीराजेंच्या दक्षिण दिग्विजयच्या मोहिमेत ते राजेंसोबत होते. छत्रपतीच्या आदेशानुसार येसाजीने गोवळकोंड्याचा बादशाह अबुलहसन कुतुबशाह याच्या मदमस्त हत्तीला आपल्या अतुल्य पराक्रमाने लोळवले होते. अनेक विजयी मोहिमेचे नेतृत्व येसाजींनी केले होते.

शिवाजीराजेंनंतर शंभूराजेंसोबत त्यांनी फोंड्याला पोतुर्गीजाना पाणी पाजले या युध्दाचे वर्णन पुढीलप्रमाणे आहे. गोवा जिंकल्यावर शंभूराजेंनी पोर्तुगीजशी तह केला होता. पण औरंगजेबने,कुडाळच्या सावंतने तसेच वेंगुर्ल्याच्या देसाईने,पोर्तुगीजांना फितवून फोंडा किल्यावर आक्रमण करावयास लावले. त्यावेळी फोंडा किल्याचा किल्लेदार येसाजी कंक हा होता. पोर्तुगीजांनी जोरदार आक्रमण करून फोंडा किल्यास भगदाड पाडले. यावेळी किल्यात फक्त आठशे मावळे होते. पोर्तुगीजांनी किल्याच्या भगदाडातून आत प्रवेश केल्यानंतर येसाजी त्याचा पुत्र कृणाजी व मावळ्यांनी असा पराक्रम केला की पोर्तुगीजांची दाणादाण उडाली. पण पोर्तुगीजांची संख्या मोठी असल्यामुळे मराठ्यांचा टिकाव लागेना. याचवेळी शंभूराजें येसाजीच्या मदतीस एक हजार घोडदळ व तितकेच पायदळ घेऊन आले. त्यामुळे मराठ्यांना अधिक चेव चढला.मराठ्यांपुढे पोर्तुगीजांचा टिकाव लागला नाही त्यांचा पराभव झाला. या युध्दात येसाजी कायमचे जायबंदी झाले तर त्यांचा पुत्र कृष्णाजी युध्दात मारला गेला. या युध्दात पराक्रम गाजविल्याबद्दल शंभूराजेंनी येसाजीस एक हजार होन नेमणूक देऊन त्यांचा सन्मान केला.



राजस्थानी मल्टीस्टेट कार्यक्षेत्र महाराष्ट्र-कर्नाटक

राजस्थानी मल्टीस्टेट

को-ऑप. क्रेडीट सो.लि., परळी वैजनाथ

बँकींग • आरोग्य • शिक्षण • रियल ईस्टेट • इन्शुरन्स

मुख्य कार्यालय : मोंढा, परळी वैजनाथ, जि. बीड. मो. 9130072178, 9130072188 | कॉर्पोरेट ऑफिस : २०५,२०६, बिल्डिंग नं. २, पहिला मजला, अपना बाजार, जालना रोड, औरंगाबाद. मो. 9130072176,

टोल-फ्री : 18004197501 rajasthanimultistate.in | संपर्क अनंत भाग्यवंत ९१३००७२१८९



चंदुलाल बियाणी

संस्थापक अध्यक्ष

Rajasthani Multistate MINI BANKING www.rajasthanimultistate.in

Powered by Tatkal Banking

आता बँकिंग व्यवहार करणे झाले सोपे... राजस्थानी मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सो.लि.,चा तात्काळ बँकिंगच्या माध्यमातून तब्बल ४१८ बँकांशी होणार सेकंदात व्यवहार...

कोणतेही बँकिंग व्यवहार करणे फक्त 9 सेकंदात शक्य

तात्काळ बँकिंग सुविधा

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया मान्यताप्राप्त, NPCI द्वारे संचलित भारत बिल पेमेंट सिस्टम (BBPS), मोबाईल/डी.टी.एच. रिचार्ज आणि इतर सुविधा

* नियम व अटी लागू

कोणत्याही बँकेत पैसे डिपॉझिट करणे. | कोणत्याही बँकेत पैसे ट्रान्सफर करणे. | कोणत्याही बँकेतून पैसे काढणे | मोबाईल बँकिंग सुविधा | Bank Account Verification सुविधा | NEFT/RTGS सुविधा | IMPS/UPI सुविधा | आधार पेमेंट सुविधा | QR Code सुविधा

# न्यायिक प्रश्नांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर धरणे आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** आंबेडकरवादी संघर्ष समितीतर्फे महत्वपूर्ण बैठक नुकतीच सुभेदारी गेस्ट हाऊस येथे नायबराव दाभाडे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. त्यामध्ये आंबेडकरी समाजाच्या विविध प्रश्नांसंदर्भात सखोल चर्चा करण्यात येवून पुढील मागण्यांसंदर्भात दि.०२ मे २०२३ रोजी मा. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात येईल, असे समितीचे अध्यक्ष श्रावणदादा गायकवाड यांनी प्रमुख मार्गदर्शन करताना जाहीर केले आहे. तर अध्यक्षीय समारोप नायबराव दाभाडे यांनी केला आहे.

यावेळी नानासाहेब शिंदे, वसंतराव वक्ते, मनिष नरवडे, मोहनलाल गोरमे, उत्तमराव जाधव, संतोष मोकळे, अशोक गरुड, संजय म्हस्के, ज्ञानेश्वर खंदारे, सुनिल अवचरमल, ॲड. अतुल कांबळे मुकूंद दाभाडे, संगिताताई जाधव / भालेराव, करुणाताई पाईकडे, हर्षा रत्नपारखे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. तर, पवन पवार, संजय जाटवे, मदन भगुरे, किसन फुलमाळी, नवल सुर्यवंशी, अंकुश शिंदे, अमोल भालेराव, सुरज मगरे, विशाल बनकर, अनिल गवळे, गौतम सोनवणे, राजु बनकर, भाई प्रकाश जाधव, विजय मोरे, नरेश वरठे, किशोर ससाणे, सचिन गायकवाड, कांतीलाल सोनवणे, प्रमोद मगरे, नितीन दाभाडे, शैलेश झाल्टे, विशाल मोरे, समाधान सावंत, पुष्पानंद नितनवरे, बाबासाहेब सुरडकर, मधुसुदन सावंत, शुभम सोनवणे, विशाल तिडके, सचिन खंदारे, रंजित खरात, सुदर्शन तेलनार, भागीनाथ नलावडे, अरुण खरात, बाबासाहेब बोरुडे, संदिप अहिरे, कुणाल गायकवाड आंदीची उपस्थिती होती.



**मागण्या :** १) शासन निर्णयानुसार छत्रपती संभाजीनगर शहरामधील शासन घोषित झोपडपट्टीवासियांना तात्काळ पी. आर. कार्ड ( मालकी हक्क ) देण्यात यावे. २) मागासवर्गीयांचे विविध मंडळामार्फत देण्यात आलेले दि. ३१ मार्च, २०२३ पर्यंतचे थकबाकी कर्ज विनाअट माफ करण्यात यावे. ३ )शासकीय कर्ज योजनेतर्गत सिबीलची अट रद्द करा. ४) शासकीय कर्ज योजने अंतर्गत मंजूर व वाटपाचे अधिकार बँक मॅनेजर यांनाच पुर्वीप्रमाणे देण्यात यावे. ५ )शासकीय कर्ज योजने अंतर्गत दिलेल्या उद्दिष्टाप्रमाणे कर्ज मंजूर व वाटप करण्यास टाळाटाळ करणाऱ्या बँक व्यवस्थापनाविरुध्द ॲट्रासिटीचा व मानसिक त्रास दिल्याबाबत गुन्हा दाखल करण्यात यावा. ६ )ॲट्रासिटी कायद्यातर्गत गुन्हा दाखल झाल्यानंतर अत्याचार पिडिताच्या खात्यावर तात्काळ अनुदान जमा करण्यात यावा.

# लोकशाहीमध्ये ‘मन की बात’ नाही तर ‘जनता की बात’ करावी लागते : नाना पटोले

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या ‘मन की बात’च्या १०० व्या भागाचा मोठा गाजावाजा करण्यात आला. ‘मन की बात’ चे १०० भाग पूर्ण केले पण पंतप्रधान मोदींनी देशातील ज्वलंत मुद्द्यांचा एकाही भागात उल्लेख केला नाही. महागाई, बेरोजगारी, ढासळती अर्थव्यवस्था, चीनची दादागिरी, महिला कुस्तीपटूंवर भाजपा खासदाराने केलेले लैंगिक अत्याचार, कर्नाटकातील ४०% भ्रष्ट सरकार, बँक लुटेरे, शेतकरी, कामगार यांच्या प्रश्नावर ‘मन की बात’ करावी वाटत नाही. लोकशाहीमध्ये ‘मन की बात’ नाही तर ‘जनता की बात’ करावी लागते, असा घणाघाती हल्ला महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे.

मोदींच्या ‘मन की बात’वर सडकून टीका करताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, देशातील जनता महागाईत होरपळून निघत आहे, अर्थव्यवस्था रसातळाला पोहचली आहे. सीमेवर चीनच्या भारतविरोधी कारवाया वाढलेल्या आहेत पण मोदी चीनचा साधा उल्लेखही करण्याचे धाडस दाखवू शकत नाहीत. नरेंद्र मोदींचे मित्र सामान्य लोकांचे बँकांतील कोट्यवधी रुपये घेऊन देशाबाहेर पळून गेले पण त्यावर मौन बाळगून असतात. कर्नाटकात ४० टक्के कमीशनचे सरकार आहे. मुख्यमंत्रीपदाचा लिलाव लागतो पण त्यावर मोदी ‘मौनी बाबा’सारखे गप्प आहेत. फक्त काँग्रेसला शिव्या देणे व स्वतःची स्तुती करणे यापलिकडे मोदींची ‘मन की बात’ पुढे सरकतच नाही. भाजपाच्या देशभरातील मंत्री, संत्री, पदाधिकारी यांना मात्र मोदींचा या आत्मस्तुती कार्यक्रम नाईलाजाने व जबरदस्तीने ऐकवा लागत आहे.

उद्योगपती मित्र अदानीला देशातील सर्व महत्वाची कार्यक्षेत्रे देऊन टाकली आहेत. याच अदानीच्या घशात मोदींनी देशातील जनतेचे स्टेट बँक ऑफ इंडिया व एलआयसीमधील कोट्यवधी रुपये घातले. अदानीच्या कंपन्यात २० हजार कोटींची बेनामी गुंतवणूक आहे, पण त्यावर ‘मन की बात’ करावी वाटत नाही असा म्हणत मोदीजी, “इधर उधर की न बात करो, ये बताओ अदानी से आपका रिश्ता है क्या ?” असा सणसणीत टोलाही काँग्रेस प्रदेशाध्यक्षांनी लगावला.

# सावळदबारा येथे जि.प. कें. प्राथमिक शाळेत प्रवेश पूर्व तयारी मेळावा

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत 28 एप्रिल रोजी सकाळी ९ वाजता शाळा पूर्व तयारी मेळावा उत्साहात पार पडला. यावेळी जवळ पास सहा विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ते प्रा जीवन कोलते पाटील, केंद्रप्रमुख एम.डी.सोनेने व भागवत गायकवाड उपस्थित होते. तर अध्यक्ष म्हणून शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष तडवी, शालेय व्यवस्थापन समिती सदस्य संदीप राजपूत उपस्थित होते. यावेळी माता पालक गटातील मातांनी सुंदर अशी रांगोळी काढून नवगतांचे स्वागत करण्यात आले. मुख्याध्यापक एम.डी.सोनेने व शिक्षिका निता हिरास यांनी शाळेच्या प्रांगणात रांगोळ्या काढून शाळेची सजावट, स्टॉल मांडणी केली. यावेळी प्रवेशपात्र विद्यार्थ्यांची मिरवणूक काढण्यात आली. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते नवगतांचे औक्षण गुलाबपुष्प, चॉकलेट देऊन विद्यार्थी व पालक यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ व्हि.पी.राजपूत,उपसरपंच मो आरिफ मो.लुखमान, जब्बार तडवी पत्रकार, शिक्षकवर्ग गजानन गवयी, सतीश ढोणे,शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्य, पालक व विद्यार्थी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भागवत गायकवाड यांनी केले तर सतीश ढोणे यांनी आभार मानले.






बीडचे भूमिपुत्र माननीय संतोष चपळगावकर यांची मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती पदी नियुक्ती झाल्याबद्दल महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या वतीने त्यांचा बीड येथे पुस्तक भेट देऊन सत्कार करताना पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे.दैनिक दिव्य लोकप्रभाचे संपादक संतोष मानूरकर आणि पत्रकार संघाचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष तथा दैनिक समर्थ राजयोगचे संपादक वैभव स्वामी.

# विद्युत पुरवठा पूर्ववत करणारा कंत्राटी वायरमन विद्युत खांबावरून पडून गंभीर जखमी

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** येथे शुक्रवारी झालेल्या वादळी गारपिटीच्या पावसात खंडित झालेला विद्युत प्रवाह सुरळीत करण्यासाठी खांबावर चढलेल्या कंत्राटी वायरमनचा तोल गेल्याने खांबावरून पडून गंभीर जखमी झाल्याची घटना रविवारी सकाळी साडे अकरा वाजेदरम्यान घडली. पोलवरून खाली पडून झालेल्या अपघातात गंभीर जखमी झालेल्या कंत्राटी वायरमनचे नाव ऋषिकेश विष्णू बागले ( वय २५ ) रा.नारळीबाग -सोयगाव असे असून तो महावितरण कंपनीच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांना मदतीसाठी वाल्मिकी पुराभागात विद्युत पुरवठा सुरळीत करण्यासाठी खांबावर चढून तार जोडनी करत होता. तार जोडणी करून ताण देतांना त्याचा अचानक तोल गेल्याने तो ३० फूट उंचीवरून पडला. या अपघातात ऋषिकेशच्या डोक्याला मार लागून मोठी जखम झाली आहे. तसेच हात व पाय फ्रँकचर झाल्याचे समजते. त्यास महावितरण कर्मचाऱ्यांनी उपचारासाठी रुग्णालय सोयगाव व तेथून शासकीय ( १०८ ) रुग्णवाहिकेने डॉ. रघुनाथ फूसे यांच्या देखरेखीखाली जळगाव येथील शासकीय रुग्णालयात भरती केले आहे. प्रकृती स्थिर असल्याचे आरोग्य सूत्रांनी सांगितले आहे.



# देवगिरीच्या कर्मचाऱ्यांना आले सुगीचे दिवस

## अकराशे कर्मचाऱ्यांना साडेअकरा कोटी मंजूर

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** येथील देवगिरी सहकारी साखर कारखान्यातील कर्मचाऱ्यांचे १३ वर्षांपूर्वीचे भविष्य निर्वाह निधी व थकीत पगाराचे १९ कोटी ५० लाख रुपये प्राप्त झाले आहेत. हा निधी एक हजार ९०० कर्मचाऱ्यांना वाटप करण्यात येणार आहेत. सुमारे १३ वर्षांनंतर कर्मचाऱ्यांना पगार मिळत असल्याने कर्मचाऱ्यांना मोठा आर्थिक दिलासा मिळाला असून, आनंदाचे वातावरण आहे. फुलंब्री व छत्रपती संभाजीनगर दोन तालुक्यांच्या कार्यक्षेत्रामधील शेतकऱ्यांच्या हक्काचा देवगिरी सहकारी साखर कारखाना हा एकमेव सहकारी कारखाना आहे. हा कारखाना राजकीय हस्तक्षेपामुळेबंद पडून कर्जबाजारी झाला. हा कारखाना २०१२ पासून बंद आहे. या कारखान्यात एक हजार ९०० कर्मचारी काम करीत होते. त्या कर्मचाऱ्यांचा २००० ते २०१२ पर्यंतचा पगार थकीत होता; तसेच भविष्य निर्वाह निधीची रक्कमही



मिळाली नव्हती. त्यातच देवगिरी कारखान्याची जमीन समृद्धी महामार्गांमध्ये गेली. त्यातून २४ कोटी रुपये मिळाले होते. ही रक्कम ऋण वसूली प्राधिकरण विभागाकडे होती. थकीत पगार आणि भविष्य निर्वाह निधीची रक्कम मिळावी म्हणून कर्मचारी वर्गाकडून सतत मागणी केली जात होती. यासाठी या कर्मचाऱ्यांनी न्यायालयीन लढादिला. स्थत त्यांना यश आले असून कर्मचाऱ्यांना त्यांच्या हक्काचे थकीत वेतन व भविष्य निर्वाह निधीची रक्कम मिळाली आहे. देवगिरी कारखान्यामध्ये काम करणाऱ्या एक हजार १०० कर्मचाऱ्यांना थकीत पगारापोटी पाच कोटी ५५ लाख आणि पाच कोटी ६५ लाख भविष्य निर्वाह निधीपोटी जमा झाल आहेत. कर्मचारी अंशदानापोटी ५२ लाख असे एकूण १२ कोटींच्या आसपास पैसे मंजूर झाले आहेत. त्यापैकी कर्मचाऱ्यांना पाच कोटी ५५ लाख रुपये प्राप्त झाले असून, याचे वाटप सुरू असल्याची माहिती अवसायक श्रीराम सोन्ने यांनी दिली आहे.

# पारडी जिल्हा परिषद शाळेत पूर्वतयारी मेळावा

आधुनिक केसरी न्यूज



**लोहा :** तालुक्यातील पारडी येथील जिल्हा परिषद शाळेत पुर्व तयारी मेळावा संपन्न झाला.शिक्षणापासून कोणीही वंचित राहू नये.लहान मुलांना शिक्षणाची आवड निर्माण व्हावी यासाठी शासनाकडून विविध अभियान राबविण्यात येत आहेत. वयाची सहा वर्ष पूर्ण झालेल्या अंगणवाडीतील बालकांना पहिल्या वर्गात प्रवेश घेण्यासाठी शासनाच्या आदेशानुसार गुरूवारी दि. 27 एप्रिल रोजी पारडी येथील शाळेत पुर्व तयारी मेळावा आयोजित करण्यात आला होता. शाळेच्या वतीने उपस्थितांचे पुष्प गुच्छ देवून तर पहिल्या वर्गात प्रवेश घेणाऱ्या अंगणवाडी तील बालकांना पुष्प देवून भव्य स्वागत करण्यात आले. लोहा पं.स.चे गटशिक्षणाधिकारी सतीश व्यवहारे जेष्ठ शिक्षण विस्ताराधिकारी सर्जेराव टेकाळे, केंद्र प्रमुख बाबुराव फसमले यांच्या मार्गदर्शनाखाली पं.स.चे विषय तज्ञ संजय अकोले, मुख्याध्यापक किसवे एम एल यांच्या प्रमुख उपस्थितीत व शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विठ्ठल डिकळे यांच्या अध्यक्षतेखाली शाळा पुर्व तयारी मेळावा संपन्न झाला. दि.२७ एप्रिल रोजी पारडी येथील जिल्हा परिषद शाळेत प्रवेश घेण्याऱ्या विद्यार्थ्यांचे स्वागत करून विद्यार्थ्यांना शैक्षणिक गोडी निर्माण व्हावी यासाठी पालकांनी काय काळजी घ्यावी ? कोणती काळजी घ्यावी ? मार्गदर्शन करण्यात आले.सदरील शाळा पूर्व तयारी पहिले पाऊल मेळावा क्रमांक १ यात एक ते सात टेबलावरील सर्व कृती विद्यार्थ्यांकडून करून घेऊन विद्यार्थ्यांच्या शारीरिक,बौद्धिक, भावनिक विकासाबाबत माता-पालकांना विविध माहिती देण्यात आली. सदरील शाळा पुर्व तयारी मेळाव्यास सरपंच प्र. संभाजी पवार, उपसरपंच प्र.गोविंद डिकळे,ग्रामपंचायत सदस्य प्र. अरुण पवार, सदस्य प्रकाश गायकवाड, पो.पा. विनायक मटके,शाळेतील शिक्षक बालाघाटे डी.पी., देशमुख जी.एल.,सौ. कदम जे.ए.,सौ. गंगाखेडकर सी.पी., सौ इंगोले एस.एस.,सौ.कदम आर.जी.,अंगणवाडी ताई शारदा डिकळे, सुनिता कदम, उषा पवार,आशा वर्कर कमल कदम,लक्ष्मण रोकडे,शंकर डिकळे, ग्रामपंचायत सेवक शंकर डिकळे,व्यंकट डिकळे, शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य,माता पालक संघाचे सदस्य गावातील प्रतिष्ठित नागरिक महिला पालक उपस्थित होते.सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचलन पदवीधर शिक्षक बालाघाटे डी.पी.यांनी तर आभार जी.एल.देशमुख यांनी मानले.

# पो.ह.राजीव जाधव परिवाराला डॉ. मणीभाई राष्ट्रसेवा पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** जिल्ह्यातील वाकडी ता जामनेर येथील पोलिस हवालदार राजीव फुलसिंग जाधव व जाधव परिवाराचे मुले ललित जाधव व धनश्री जाधव यांना पुणे येथे दि.२७/४/२०२३ रोजी पद्मश्री डॉ. मणीभाई



राष्ट्रसेवा पुरस्कार डॉ रवींद्र भोळे यांच्या गुरुवारी समारंभ पूर्वक प्रदान करण्यात आला. राष्टभक्तीने प्रेरित होऊन समर्पित भावनेने विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या मान्यवरांना हा पुरस्कार देऊन त्यांना जाधव परिवाराला गौरविण्यात आले. राजीव जाधव हे विशेष सुरक्षा विभाग जळगाव हे दि.२१/३/१९९९ पोलिस दलात भरती झाले होते. त्यांनी समाज सेवा, उत्कृष्ट कार्य,व वृक्ष लावणे त्याला जगविणे हाच त्यांचा हेतू आहे.विविध ठिकाणी दंगा नियंत्रण पथक मधे जिवांची बाजी लावून काम केले, गेले चोवीस वर्षे पासून सेवा करत आहे. कोरोना काळात आरोग्य दूत म्हणून कार्य आहे. त्यांच्या कार्याची दखल घेऊन विवीध क्षेत्रांत निष्काम कर्मयोगी कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना पद्मश्री डॉ मणीभाई राष्ट्रसेवा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पोलिस हवालदार राजीव फुलसिंग जाधव व जाधव परिवाराला जळगाव व इतर मान्यवरांना आयोजित कार्यक्रमात प्रधान करण्यात आला ह्या वर्षीच्या २०२३ चा पुरस्कार डॉ मणीभाई देसाई राष्ट्रसेवा पुरस्कार जाहिर करण्यात आलेल्यामध्ये रीता राजपूत लेखिका कावियत्री जळगाव, हा पुरस्कार प्रदान करण्यात आल्याने निती आयोग भारत सरकार पोलिस निरीक्षक प्रतिम चौधरी साहेब विशेष सुरक्षा विभाग जळगाव व आमदार चंद्रकांत पाटील मुक्ताईनगर यांनी शुद्धा जाधव परिवाराला अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी राजीव फुलसिंग जाधव व जाधव परिवाराचे यांना शाल श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात येऊन त्यांना जळगाव येथे गौरविण्यात आले.व पुढील वाटचालीच्या शुभेच्छा मान्यवरांनी दिल्या.जळगाव जिल्हात राजीव जाधव विशेष सुरक्षा विभाग जळगाव यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# सत्ताधारी गटाला निसटते बहुमत; लासलगाव कृ.ऊ.बा.समितीचे भवितव्य अपक्षाच्या हाती

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** आशिया खंडात सर्वात मोठी उलाढाल असलेल्या लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समिती पंचवार्षिक निवडणुकीत सत्ताधारी ज्ञानेश्वर जगताप व पंढरीनाथ थोरे गटाला ९ जागा तर मा.जि.प.अध्यक्ष बाळासाहेब क्षिरसागर व जयदत्त होळकर या माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ समर्थक गटाला ८ जागा, तर एक अपक्ष विजयी झाले आहेत. सत्ताधारी शेतकरी पॅनलचे सोसायटी सर्वसाधारण गटातून राजेंद्र डोखळे (३४८), गणेश डोमाडे (४१५), सोसायटी महिला राखीव गटातून सुवर्णा जगताप (४१२), ग्रामपंचायत गट (सर्वसाधारण) ज्ञानेश्वर जगताप (३०३), पंढरीनाथ थोरे (३२२), आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक गटातून राजेंद्र बोरगुडे (२५०), अनुसूचित जाती/जमाती गटातून महेश पठाडे (२२४), हमाल-मापारी मतदारसंघ गटातून रमेश पालवे (२०९) यांचा विजय झाला तर बाळासाहेब दराडे (१७७) हे चिठ्ठी पद्धतीने विजयी झाले. शेतकरी विकास पॅनलचे सोसायटी सर्वसाधारण गटातून जयदत्त होळकर (४३४),








बाळासाहेब क्षिरसागर (४५७), संदीप दरेकर

**भुजबळ समर्थक गटाचा चिट्ठीने केला घात**

भुजबळ समर्थक गटाचे ज्ञानेश्वर गांगुर्डे व सत्ताधारी थोरे व जगताप गटाचे बाळासाहेब दराडे यांना समसमान (१७७) मते पडली . ज्ञानेश्वर गांगुर्डे यांच्या मागणीवरून फेर मतमोजणी करण्यात आली मात्र त्यात काही बदल झाला नाही . त्यामुळे पवन सोनकर (वय ११) इलाहाबाद या मुलाच्या हातून चिठ्ठी काढण्यात आली . सोडतीद्वारे बाळासाहेब दराडे यांना विजयी घोषित केले .

(३९०), भीमराज काळे (४३५), छबुराव जाधव (३८०), सोसायटी इतर मागासवर्गीय गटातून डॉ.श्रीकांत आवारे (४२९), सोसायटी विमुक्त जाती भटक्या जमाती गटातून तानाजी आंधळे (४९०), महिला राखीव गटातून सोनिया होळकर (४५४), तर अपक्ष प्रवीण कदम (२१३) हे विजयी झाले. अटीतटीच्या लढतीत होळकर गटाचे हरिश्चंद्र भवर, आशिष मोगल, शिवाजी सुरसे, सचिन ब्रह्मेचा, तर थोरे गटाचे शिवनाथ जाधव, दत्तात्रय डुकरे, भास्करराव पानगव्हाणे, सुभाष कराड, प्रीती बोरगुडे, अपक्ष मधुकर गायकर, नंदकुमार डागा यांचा पराभव झाला. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून तहसीलदार शरद घोरपडे यांनी कामकाज पाहिले.

# भारतीय संस्कृत ज्ञान परीक्षा विद्यार्थीनी राज्यातून प्रथम

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** अखिल भारतीय संस्कृत ज्ञान परीक्षा मध्ये आय .एस.ओ. जिल्हा परिषद उच्च प्रा.शाळा मल्हारा वर्ग पाच च्या कु. समीक्षा मुकेश इंगळे आणि ईशवरी सुरेश बोरेकर ह्या दोन विद्यार्थीनी राज्य स्तरीय, अखिल भारतीय संस्कृती ज्ञान परीक्षेत घवघवीत यश प्राप्त केले. समीक्षा मुकेश इंगळे हिला 100% गुण मिळाले तर ईशवरी सुरेश बोरेकर हिला 99% गुण मिळाले आहे. विद्यार्थीनी आपल्या यशाचे श्रेय वर्ग शिक्षक आदर्श शिक्षक बबलू कराळे, आई वडील तसेच ISO जिल्हा परिषद उच्च प्राथमिक मराठी शाळा मल्हाराचे अध्यक्ष उत्तमराव शेळके (शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष), दीपकराव तायडे (उपाध्यक्ष शाळा व्यवस्थापन समिती) मुख्यद्यापक कु. शीला सोळंके, केन्दप्रमुख श्रीकृष्ण उघडे सर, शिक्षक कल्पना चौधरी, बबिता पंडित, रुपलाल बेठे, किरण साकरकर, रश्मी पानझाडे यांना देतात.





# सरकारला मराठवाडा मुक्तीसंग्राम अमृत महोत्सवी वर्षाचा विसर

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मराठवाडा मुक्ती संग्रामाचे यंदा ७५ वे वर्ष असून हे अमृत महोत्सवी वर्ष मोठ्या प्रमाणात साजरे करून मराठवाडा मुक्तीसंग्रामात बलिदान दिलेल्या हुतात्म्यांचे व स्वातंत्र्याचे स्मरण करून त्यांना अभिवादन करणे, नव्या पिढीला मुक्तीसंग्रामाच्या लढ्याची माहिती व्हावी या उद्देसाने महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या वतीने मराठवाड्यात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. १ मे रोजी महाराष्ट्र दिनी मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यात ध्वजारोहणानंतर मराठवाडा मुक्तीसंग्राम स्तंभापर्यंत प्रभात फेरी काढून स्वातंत्र्य सैनिकांना अभिवादन करण्यात येणार आहे.मराठवाड्यातील जनतेच्या लढ्यानंतर आणि स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली हजारो स्वातंत्र्य सैनिकांनी केलेल्या मराठवाडा मुक्ती संग्राम लढ्यानंतर १७ सप्टेंबर १९४८ रोजी मराठवाडा निजामाच्या जोखडातून मुक्त झाला. या ऐतिहासिक लढ्याला यावर्षी ७५ वर्ष पूर्ण होत आहेत. मराठावाडा मुक्तीसंग्रामाचे हे अमृत महोत्सवी वर्ष मोठ्या प्रमाणात साजरे करण्याचा निर्णय महाविकास आघाडी सरकारने घेतला होता त्यासाठी एक समितीही स्थापन केली होती मात्र राज्यातले सरकार बदलताच सत्तेवर आलेल्या शिंदे-फडणवीस सरकारला मराठवाडा मुक्तीसंग्राम अमृत महोत्सवी वर्षाचा विसर पडला. काँग्रेस पक्षाने वारंवार शिंदे-फडणवीस सरकारला मराठवाडा मुक्ती संग्राम अमृत महोत्सवी वर्षाची आठवण करून दिली मात्र सत्तेची मलई खाण्यात गुंग असलेल्या या सरकारला मराठवाड्यातील जनतेच्या या लढ्याची व मराठवाडा मुक्ती संग्रामाची जाणीव नाही. काँग्रेस पक्षानेच माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली एका समितीची स्थापना करून मराठवाडा मुक्ती संग्रामाचे अमृत महोत्सवी वर्ष मोठ्या प्रमाणात साजरे करून स्वातंत्र्यसैनिक व हुतात्म्यांना अभिवादन करण्याचा, नव्या पिढीला मराठवाडा मुक्ती संग्राम लढ्याच्या इतिहासाची ओळख करून देण्याचा निर्णय घेतला. या समितीमार्फत १ मे २०२३ ते १७ सप्टेंबर २०२३ पर्यंत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. याच कार्यक्रमाचा भाग म्हणून १ मे रोजी महाराष्ट्र दिनी संपूर्ण संपूर्ण मराठवाड्यात ध्वजारोहण झाल्यानंतर ध्वजारोहणाचे ठिकाण ते मराठवाडा मुक्ती संग्राम स्मारकापर्यंत प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले आहे. मराठवाड्याला मुक्त करण्यासाठी आपल्या प्राणांचे बलिदान देणाऱ्या सर्व हुतात्म्यांना व स्वातंत्र्यसैनिकांना अभिवादन करण्यात येणार आहे.

## दोन वाघांच्या झुंजीत एकाचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** सांबराची शिकार केल्यानंतर दोन वाघांमध्ये झालेल्या झुंजीत एकाचा मृत्यू झाल्याची घटना मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या गुगामल वन्यजीव विभागातील वैराट परिसरात उघडकीस आली आहे. या वाघाचे वय ४ ते ५ वर्षे आहे. चिखलदरा नजीकच्या वैराट वन वर्तुळात काही वन कर्मचारी नियमित गस्तीवर असताना त्यांना पचंबा बिटमध्ये एक वाघ मृत्युमुखी पडल्याचे दिसले. त्यांनी तात्काळ वरिष्ठ अधिकाऱ्यांना या घटनेची माहिती दिली. गुगामल वन्यजीव विभागाचे उपवनसंरक्षक सुमंत सोळंके, सहायक वनसंरक्षक इंद्रजित निकम, चिखलदरा येथील वनपरिक्षेत्र अधिकारी डॉ. मयूर भैलुमे, 'एनटीसीए'चे प्रतिनिधी राकेश महल्ले, अल्केश ठाकरे यांच्या उपस्थितीत पाहणी करण्यात आली.




# पिसाळलेल्या कुत्र्यांचा हैदोस; १९ मेंढ्या ठार

## नुकसान भरपाई देण्याची गावकऱ्यांची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**बाबूराव गोणारकर**

**धर्माबाद :** नगरपरिषद हद्दीत मोकाट व पिसाळलेल्या कुत्र्यांनी हैदोस घालत असून शनिवारी ( ता. २९ ) रत्नाळी येथील गंगाधर मधनुरकर व लालू उरेकर यांच्या १९ मेंढ्या व त्यांच्या पिल्यांचे लचके तोडून पिसाळलेल्या कुत्र्यांनी प्राण घेतला आहे.संबंधित नुकसानीचा पंचनामा करून त्याना नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी होत आहे. न्यायालयच्या निर्णयामुळे कुत्र्यांना जीवे मारण्यावर निर्बंध आहेत. त्यामुळे एकेकाळी नगर परिषद प्रशासनाकडून मोकाट कुत्र्यांना औषध देऊन मारण्याची प्रक्रिया बंद झाली. परिणामी शहरात व गावात मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट माजला आहे. मोकाट कुत्र्यांची वाढती संख्या आणि शहरीकरणामुळे लोकांचे कुत्र्यांना जे अन्न देण्याची प्रक्रिया होती. ती घटली आहे. मग हे कुत्रे अन्नाच्या शोधात लहान लेकरे, बकरी, मेंढ्या, कोंबडे यांना शिकार बनवीत आहे. तसेच लोकांना रात्री पायी चालताना किंवा दुचाकी वाहनावर चालताना जीव मुठीत घेऊन चालावे लागत आहे. अलीकडे बऱ्याच नगर परिषदा उपाय योजना म्हणून अशा मोकाट कुत्र्यांना पकडून एखाद्या एनजीओ मार्फत त्यांची काळजी घेण्याची मोहीम हाती घेत आहेत. किंवा त्यांची नसबंदी ही केली जात आहे. जेणे करून त्यांच्या संख्येवर नियंत्रण ठेवले जाईल. तसेच त्यांना रेबीजचे इंजेक्शन दिल्यास त्यांनी चावा घेतला तरी संबंधित व्यक्ती किंवा प्राण्याच्या जीवाचा धोका टाळता येतो. धर्माबाद नगर परिषद हद्दीतील रत्नाळी येथील गंगाधर मधनुरकर व लालू उरेकर यांच्या १९ मेंढ्याचे हकनाक बळी या पिसाळलेल्या कुत्र्यांनी घेतला आहे. यामुळे त्यांचे जवळपास दीड लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. या नुकसानीस जबाबदारी कोण? त्यांचा कोणातही दोष नसताना प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे, त्यांच्या गलथान कारभारामुळे



नगर परिषद, तहसील प्रशासन व आरोग्य विभागानी एकत्रित येऊन लोकांच्या व मुक्या प्राणाच्या जीवाशी खेळणाऱ्या या मोकाट व पिसाळलेल्या कुत्र्यांचा बंदोबस्त करावा . तसेच मधनुरकर व उरेकर यांच जे नुकसान झालं आहे . त्यांना नुकसान भरपाई द्यावी अन्यथा आम्ही लोकशाही मार्गाने तुमच बंदोबस्त करू .अशी भावना अशोक पूजरवाड,पुंडलिक पूजरवाड, संजीव रेड्डी व रत्नाळीवासियांनी व्यक्त केली आहे .

या मेंढपाळाना हकनाक आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. त्यामुळे झालेल्या घटनेचा पंचनामा करून त्यांना नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी संतप्त गावाकऱ्याकडून होत आहे.

# हॉलिबॉल स्पर्धेत स.भु.च्या संघ तृतीय

आधुनिक केसरी न्यूज

**वडोद बाजार :** विभागीय स्तरावर हॉलीबॉल स्पर्धेत 14 वर्ष आतील मुलींच्या संघाने प्रथम क्रमांक पटकावलेला असून या संघाची राज्यस्तरावर निवड झाली होती . क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे तथा जिल्हा क्रीडा परिषद पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय शालेय हॉलीबॉल स्पर्धा "शिवाजी इंग्लिश मीडियम स्कूल सासवड, जिल्हा पुणे येथे दि. 28 ते 29 एप्रिल 2023 दरम्यान आयोजित करण्यात आलेली आहे. स. भु. प्रशाला वडोद बाजार येथील चौदा वर्ष आतील मुलींचा संघ राज्यस्तरीय हॉलीबॉल स्पर्धेत वडोद बाजार संघाने नासिक, अमरावती ,नागपुर विभागाला पराभूत करून, तिसऱ्या क्रमांकावर अत्यंत चुरशीच्या सामन्यामध्ये नागपूर विभागाला सरळ दोन सेटमध्ये पराभूत करून तिसरे क्रमांक पटकावले. या यशाबद्दल शालेय समितीचे अध्यक्ष अमोल भाले , शालेय समितीचे सदस्य तथा वडोद बाजार येथील उपसरपंच गोपाळराव पा. वाघ, शालेय समिती सदस्य रामदासजी कापसे तसेच प्रशालेचे मुख्याध्यापक गणेशसिंग गौर सर.व पर्यवेक्षक एन. वाय. वाघ यांनी स्पर्धकांचे व प्रशालेचे क्रीडाशिक्षक एस. बी. पचलुरे यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



# एकटाच आलो नाही युगाचीही साथ आहे, कामगार आहे मी तळपती तलवार आहे



अनिल पुरी
संपर्क 9860886744

आधुनिक केसरी

**१मे हा आंतरराष्ट्रीय कामगार दिन म्हणून .पूर्ण जगभरात विविध देशात साजरा केला जातो.या दिवसाला जागतिक स्थरावर "मे डे" या नावानेही ओळखले जाते."मे डे" या नावाने आंतरराष्ट्रीय स्थरावर हा दिवस मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. सतराव्या शतकाच्या मध्यापासून सुरु झालेल्या औद्योगिक क्रांतीने यूरोपमध्ये एका नव्या परवाला सुरुवात केली होती.**

पण त्याच बरोबर नविन समस्याही निर्माण होत होत्या.त्यातीलच एक प्रमुख समस्या म्हणजे कामगाराचे शोषण,पिळवणूकीला सुरुवात झाली.त्यावेळी कामाचे तास हे तब्बल १५ तास होते.कामगारांचे जीवण हालाकीचे झाले होते. त्यांना त्याच्या मेहनतीच्या मोबदल्यात योग्य तो पगार मिळत नसे.कामगाराच्या अशा परिस्थितीतून पुढे जगाचा इतिहास बदलला.कामगाराची पहिली मागणी ८ तास कामाची होती.या व अशा विविध मागण्यासाठी कामगार आक्रमक झाले.यातून पुढे मोठी कामगार चळवळ निर्माण झाली.या चळवळीला चांगले यश आले.आणि हा आनंद उत्सव म्हणून १ मे हा जागतिक कामगार दिन म्हणजे उदयास आला.भारतात १९२३ ला पहिल्यांदा कामगार दिन साजरा केला गेला.यावेळी भारतात पहिल्यांदाच लाल झेंडा कामगार दिनाच प्रतिनिधत्व करण्यासाठी वापरण्यात आला होता.गेली अनेक वर्षापासून जागतिक स्थरावर आणि महाराष्ट्रात १ मे हा कामगार दिन मोठ्या उत्साहान साजरा केला जातो.कामगारांना या दिवशी सुट्टी असते.

अनेक ठिकाणी कामगार पुरस्काराचे वितरण केले जाते. कामगारांच्या शौर्याचे प्रतिक म्हणून हा दिवस साजरा केला जातो. असे असले तरीही कामगारांसाठी एकच दिवस सन्मानाचा नसून त्यांचा सन्मान नेहमीच झाला पाहिजे.आज कामगारांची दैनिय अवस्था होत असल्याचे चित्र आहे.आपल्या विविध मागण्यासाठी कामगार आज रस्त्यावर आलेला आपल्या दिसत आहे. बँक एसटी कर्मचारी एलआयसी विज कर्मचारी.आरोग्य कर्मचारी आपल्या हक्कासाठी लढताना दिसत आहेत.पण त्यांच्या मागण्यांना फार यश येताना दिसत नाही.पोळ्याच्या दिवशीच बैलाचा मान केला जातो.तशी ही औपचारिकता कामगाराची १मे दिवशी होत आहे.कामगारांचे वेतन,नौकरीचे संरक्षण,कामाचा मोबदला त्यांचे आरोग्य अशा प्रमुख मागणीकडे तरी प्रशासनाने लक्ष देऊन त्यांच्या मागण्या पुर्ण कराव्यात एकढीच जागतिक कामगार दिना निमित्त मापक अपेक्षा आहे. **एकटाच आलो नाही,युगाचीही साथ आहे.**
**सावध असा तुफानाची हीच सुरूवात आहे**
**कामगार आहे मी,तळपती तलवार आहे.**
**सारस्वतांनो थोडासा गुन्हा मी करणार आहे.**

# महात्मा बसवेश्वरांचे विचार कार्य प्रेरणादायी : झुंबरे

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** अखिल भारतीय इतिहास संकलनयोजना संलग्न इतिहास संकलन संस्था महाराष्ट्र प्रांत व अँड बीडी हंबर्डे महाविद्यालय आष्टी जि बीड संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय चर्चासत्र संत महात्मा बसवेश्वर यांच्या विचारांची प्रासंगिकता यावर ऑनलाईन संपन्न झाले. यात बसवविचाराचे अभ्यासक झुंबरे यानी महात्मा बसवेश्वर यांचे मुल्य यावर चितंन मांडले आजच्या शतकात हे मानवजातीसाठी उपयोगी आहे. प्रदुषण मुक्त पर्यावरण रक्षण सर्व सजीवासाठी निर्माण करण्याची प्रेरणा बसवेश्वर यांच्या विचारातुन सनमानसास मिळते. तसेच प्रा डॉ सच्चिदानंद बिच्चेवार यांनी महात्मा बसवेश्वर सामाजिक विचार यावर आपले विचार व्यक्त केले. बसवेश्वर याचा सामाजिक घडणीत, भारत घडवण्यात मोलाचा वाटा मानवता समता हे विचार मोलाची आहेत. 12वे शतकातील हे विचार आजही उपयुक्त आहेत. बसवेश्वर यांच्या जीवनात भौतिक संपन्नता होती. कौटुंबिक जीवनात ही ते सुखी होते. बालपणी अनेक प्रश्न त्याना पडले समाजात फिरताना कोणाबरोबर रहावे ? बसावे ? हा कनिष्ठ ? ही कृती त्याना योग्य वाटत नव्हती. उपनयन संस्कार त्यांच्यावर केले कुटुंबात हा संस्कार स्त्रियांना का नाही ? बहीणीसाठी का नाही ? असा प्रश्न वडीलाना विचारला ज्ञानार्जन करणे साठी हा संस्कार केला तर मी करेल अन्यथा नाही कुटुंबातील हे बसवेश्वराचे पहिले बंड. समाजातील वाईट प्रथेविरुध्द त्यानी केले. या समाजव्यवस्थेला त्यानी नाकारले. सैध्दातिंक विचारात मतभेद झाले . बहीण नागप्पाच्या साह्याने नवीन व्यवस्था निर्माणासाठी प्रयत्न केला. मानवता स्त्रीमुक्ती साठी हा संघर्ष केला. चितंन मनन करुन सर्व ग्रंथातील ज्ञान प्राप्त केले.

समाजातील बदलासाठी अध्यात्मिक चितंन करणे, समाजातील प्रश्न सोडवणे यासाठी प्रयत्न करणे, मानव समाजशील प्राणी आहे. समाजातील लोक अज्ञान असणे हे समस्याचे दुःखाचे मुळ आहे. हे अज्ञान दूर करुन हे दुःख दुर करता येईल हे त्यांनी समाजसिध्दी केली. समस्या प्रचंड आहेत यावर मात करणे योग्य मिळालेल्या ज्ञानाचा वापर त्यानी समाजासाठी केली. हुशारीने त्यानी राज्याची तिजोरी चा वापर जनतेसाठी केला.यात धनाचा संचय वाढवला कतृत्वाने जनहिताची कार्ये केली. भ्रष्टाचार राज्यातील कमी केला. सर्व अठरापगड जातीना गोळा केले. प्रत्येकाची सुखदुःख जाणुन घेवुन त्याना मदत केली कर्म हे श्रेष्ठ मांडले, व्यवस्था कृती याचा मेळ घालुन समाजात बदल केला. सर्वांना एकत्र घेऊन काम केले. मुक्तपणे विचार मांडण्याची व्यवस्था निर्माण केली. अनुभव मडंप निर्माण केला. यात सर्वांना प्रवेश होता ही व्यवस्था 12व्या शतकातील पहिला प्रयोग बस्वेश्वर यानी केली . हेच आजच्या लोकशाहीचा उगम आहे. 35 स्त्रिया व 700 पुरुष लिहते झाले. स्त्रियांना हा मूलभूत शिक्षणाचा अधिकार दिला. धर्म , समाजव्यवस्था, आईवडील यां विरीध्द प्रसंगी लढा दिला पाहिजे, पण तो जनहिताचा असला पाहिजे. सर्व मानव एक आहे हा भाव निर्माण केला. मानवतेची शिकवण दिली. बंधुभाव हा श्रेष्ठ आहे. जातीव्यवस्थेस त्यानी विरोध केला, आपसातील दुही हे गुलामगिरी चे कारण आहे. त्यासाठी आपण एकसंघ असले पाहिजे. अंधश्रध्दा विरोध केला, श्रेष्ठ कनिष्ठ भाव नष्ट केला पाहिजे.अस्पृश्यतेस नाकारले सर्व समान ही संकल्पना मी सर्वात सहान आहे व तुम्ही सर्व महान आहात हा विचार त्यानी दिला. हा प्रेरणादायी विचार आहे. स्त्रीमुक्ती साठी प्रयत्न करणारे पहिले संत बस्वेश्वर महान होते.



# हाडांच्या दुर्गंधीयुक्त कारखान्यामुळे परतूरकर त्रस्त

## भरदिवसा चालणाऱ्या दुर्गंधीयुक्त कारखान्यामुळे आरोग्य धोक्यात !

आधुनिक केसरी न्यूज

**सुरेश कवडे**

**परतूर :** शहर गावभातील रांजणी रोडवर रात्रभर बंद तर भरदिवसा चालणारा हाडांचा कारखाणा हाडांची भुकटी तयार करणाऱ्या कारखान्यांच्या दुर्गंधीमुळे परतुर शहरातील गावभागमधील नागरिक त्रस्त झाले आहेत. प्रदूषणामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. परतुर शहरातील गावभागातून जाणारा रस्ता पारधीवाडा ते रांजणी रोडपासुन अगदी हकेच्या अंतरावर कुरुकक्षेत्र महादेव मंदीर पारधीवाडा परिसरात जणावरांच्या हाडापासुन भुकटी पावडर किंवा पेस्ट तयार करणे यासाठी हाडांचा कारखाणा सुरु झाला आहे. मुख्य रस्त्यालगतच हा कारखाणा असल्याने रस्त्यावरुण रहदारी करणाऱ्यांना दोन दोन कि .मि . अंतर पार करेपर्यंत आपले नाक दाबुन ठेवून दुर्गंधीयुक्त वासाचा त्रास सहण करावा लागतो तर कारखाण्यात विविध प्राण्यांच्या हाडापासून भुकटी तयार करण्यात येते. सडलेले मांस आणि हाडांमुळे परिसरात प्रचंड दुर्गंधी निर्माण होत आहे. रांजणी रोडवरूण रहदारी करणाऱ्यां प्रवाशांना आणि शहरातील पारधीपाडा , इंदिरानगर परिसरातील भागातील नागरिक या दुर्गंधीमुळे त्रस्त असुन आजारी पडताहेत तर दुर्गंधीयुक्त वासामुळे रात्रभर झोप येत नसल्याने सामान्य नागरिकांतुन संताप व्यक्त केला जात आहे . हा कारखाना कुठलेही निकष पाळत नसून त्यांना रीतसर परवानगीही देण्यात आलेली नसल्याचे नागरीकांतुन बोलले जात आहे. तरी स्थानिक प्रशासनाने नगर परिषद, तहसीदार, पोलिस निरीक्षक, प्रदुषण नियंत्रण मंडळ या हाडांच्या पेस्ट तयार करणाऱ्या दुर्गंधीयुक्त कारखाण्यावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी जोर धरत आहे.

शहरासह जिल्ह्यातील अनेक ठिकाणांहुण येताहेत दुर्गंधीयुक्त हाडांच्या गाड्याभरूण या दुर्गंधीयुक्त कारखाण्यात जणावरांच्या हाडापासुन पावडर , पेस्ट यांसह इतर तेलजण्य पदार्थ जसे की , डालडा तूप इतर तेलजण्य पदार्थ तयार तर करत नाहीत ना तयार करत असतील तर ते कुठे विक्री करतात हेही तपासणे गरजेचे आहे . असे काही प्रकार घडत असतील संबंधीत विभागाणे तात्काळ कारवाई करण्यात यावी व संबंधीत कारखाण्याला सिल करावे अशी मागणी जण सामान्यांतुन होत आहे .

महाराष्ट्र व कामगार दिनाच्या हार्दिक शुभेच्छा

आपले मुलगा / मुलगी सद्य परिस्थितीत स्वतःचे सरंक्षण करण्यात सक्षम आहेत का ?
त्यांना तनाने आणि मनाने कणखर बनवण्यासाठी
आम्ही येतोय आपल्या जवळच
विश्वस्त जागृत हनुमान मंदीर, विद्यानगर यांच्या सौजन्याने

जूदो प्रात्यक्षिक
आणि
मोफत जूदो व स्वःसरंक्षण शिबीर
१ मे ते ७ मे २०२३ पर्यंत
स्थळ : जागृत हनुमान मंदीर, विद्या नगर

आयोजक
औरंगाबाद जिल्हा जूदो संघटना

श्री. अजित मुळे – अध्यक्ष
श्री. अतुल बामनोदकर – सचिव, ब्लॅकबेल्ट प्रशिक्षक
श्री. दत्ता आफळे – ४ दान ब्लॅकबेल्ट व चेअरमन तांत्रीक समिती
श्री. चंद्रशेखर पोळ – ब्लॅक बेल्ट, प्रशिक्षक
श्री. दत्तु पवार – प्रशिक्षक
सौ. दिप्ती शेवतेकर-नावंदे – ब्लॅकबेल्ट, राष्ट्रीय प्रशिक्षक

मुंबई पब्लीक ट्रस्ट क्रमांक F-779 (सो. रजि. क्र. MAH-28/8/-AGD) सलग्न महाराष्ट्र जूदो संघटना

अधिक माहितीसाठी संपर्क
श्री. चंद्रशेखर पोळ 9158882849, श्री. दत्तु पवार 992388839
श्री.अतुल बामनोदकर - 9881067338

# ॲड. अक्षय बाहेती यांचा महाराष्ट्र भाजपाच्या वतीने सन्मान

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या १०० व्या मन की बात या कार्यक्रमाच्या निमित्ताने भारतीय जनता पक्ष महाराष्ट्र प्रदेश च्या वतीने ॲड. अक्षय बाहेती यांना मन की बात प्रोत्साहन गौरव सन्मान पुरस्कार पुण्याचे जेष्ठ विधिज्ञ एस.के.जैन यांच्या हस्ते देण्यात आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा समाजहिताचा आदर्श समोर ठेवून समाज हितासाठी विशेष कार्य करणाऱ्या युवकांचा सन्मान कार्यक्रमाचे आयोजन भारतीय जनता पक्षाचे सेवा प्रकोष्ठ महाराष्ट्र राज्याचे संयोजक शेखर मुंदडा यांनी केले होते. ॲड. अक्षय बाहेती हे रक्तदानाच्या सामाजिक कार्यात अग्रेसर आहेत. त्यांचा रक्तदानाचा विश्वविक्रम असून त्यांनी अवघ्या ३१ वर्षाच्या वयात तब्बल ५० वेळा रक्तदान केला आहे. तसेच रक्ताची गरज कोणाला भासल्यास अर्ध्या रात्रीही ते मदतीसाठी धावून जातात. रक्तदानासह त्यांनी अपघातग्रस्तांना वेळेवर रूग्णालयात पोहोचऊन शेकडो लोकांचा जीव वाचवण्यात मोलाची भुमिका बजावली आहे. या उल्लेखनीय सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना मन की बात प्रोत्साहन गौरव सन्मान पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यावेळी महा एनजीओ फेडरेशन चे संचालक अक्षय महाराज भोसले यांची प्रमुख उपस्थिती होती.



RAHUL S. ANCHALKAR
9850500629, 9325727798
R.R. Enterprises
घर तुमचे... इंटरीयर आमचे !
आपल्या घरातील आतील संपूर्ण सजावट आम्ही करू, वेल डेकोर फर्नीचर, किचन ट्रॉलीज, सोफा, बेड सर्वकाही तुमच्या स्वप्नाप्रमाणे
Add. : N-8, Behind Onkar Gas, CIDCO, Aurangabad-431 003
E-mail : anchalkarrahul@gmail.com
Web:rrenterprises.com

# समाज प्रबोधनकार राष्ट्रसंत तुकडोजी



प्रा .सौ. शारदा वानखेडे
संपर्क क्र. 9823066606

आधुनिक केसरी

**महाराष्ट्र ही संतांच्या पदस्पर्शाने पावन झालेली भूमी आहे. अनेक संतांनी आपल्या भजन, किर्तन व अभंगातून समाजप्रबोधनाचे महान कार्य केले आहे.असेच एक संत म्हणजे वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज होत. त्यांचा जन्म ३०एप्रिल १९०९ रोजी बंडोजी व मंजुळाबाई या दांपत्याच्या पोटी झाला. त्यांचे मूळ नाव माणिक बंडोजी इंगळे ठाकूर असे होते. परंतु त्यांचे गुरु अडकोजी यांनी त्यांना तुकडोजी असे नाव दिले.**

जातिभेद व अंधश्रद्धा निर्मूलनासाठी तुकडोजी महाराजांनी भजन व कीर्तनाचा प्रभावी वापर केला. महाराष्ट्राबरोबरच त्यांनी देशभरात आणि जपान मध्ये जाऊन सर्वांनाच विश्वबंधुत्वाचा संदेश दिला. त्यांची क्रियाशीलता व वैचारिकता एवढी प्रभावी होती की त्यांना तत्कालीन राष्ट्रपती डॉ.राजेंद्र प्रसाद यांनी 'राष्ट्रसंत' ही उपाधी दिली.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या अनेक भजनांमधून त्यांनी समाजप्रबोधनाचे कार्य केले आहे. 'ग्रामगीता 'हा त्यांचा ग्रंथ खूप प्रसिद्ध आहे. तुकडोजी महाराज म्हणत,"माणूस म्हणून जन्माला येणे आणि माणूस बनणे या दोन गोष्टी अत्यंत भिन्न आहेत."कारण माणसाने माणसाचा जन्म घेतल्यावर जर माणुसकीचे वर्तन केले तरच तो खऱ्या अर्थाने माणूस बनतो. आपल्या एका भजनात ते म्हणतात,

**हाती नाही येणे, हाती नाही जाणे**
**हसत जगावे, हसत मरावे**
**हेच तर माझे गाणे...**

माणसाने कोणत्या कुटुंबात, कोणत्या जाती, धर्मात जन्म घ्यावा हे जरी त्याच्या हातात नसले तरी, मिळालेला जन्म सार्थ करणे मात्र त्याच्याच हाती असते. हे सुंदर जीवन हसत जगावे व हसतच या जगाचा निरोप घ्यावा. असा संदेश त्यांनी समाजाला दिला आहे. समाजात वावरत असतांना महाराजांना असे दिसले की, काही लोकांना इतरांना विनाकारण दोष देण्याची किंवा नाव ठेवण्याची सवय असते. ते स्वतः काही करणार नाहीत, व इतरांची मात्र सतत निंदा करणार. इतरांना नावे ठेवण्यात हे लोक पारंगत असतात. अशा लोकांना उद्देशून तुकडोजी महाराज सांगतात की,

**करू नको निंदा कोणाची**
**अवगुण आपुले अंतरी दिसती**
**करी चिंता त्याची**
**करू नको निंदा कोणाची**

तुकडोजी महाराज सांगतात इतरांची निंदा करण्यापेक्षा स्वतःमध्ये असलेले अवगुण शोधून त्यांचा नाश करण्याचा प्रयत्न प्रत्येक माणसाने केला पाहिजे.सर्व गुणसंपन्न असे कोणीच नसते .प्रत्येकातच काही ना काही दोष असतात. त्यामुळे इतरांचे दोष न दाखवता स्वतःच्या अंतर्मनात डोकावून पाहीले पाहिजे.

माणसाच्या जीवनात त्याच्या यशापयशात आईवडिलांबरोबरच त्याच्या मित्र परिवाराचा सुद्धा खूप मोठा वाटा असतो. मित्रांची संगत चांगली असेल तर त्या व्यक्तीचे जीवन चांगले बनते. व तो जर वाईट मित्रांच्या संगतीत असेल तर, त्याच्या जीवनाचा विनाश ही अटळ आहे. त्यामुळे मैत्री कोणाशी करावी याविषयी सांगताना महाराज म्हणतात,



**जो सत्याविन शब्द न बोले, सहजही कोणाशी।**
**मित्रा कर मैत्री त्याशी।सहनशीलता सरळ बुद्धीची वागणूक ज्याची।आपुले दुःख न वदे कुणाला ।चिंता इतरांची ।मित्रा कर मैत्री त्याची।**

जो नेहमी खरे बोलतो. ज्याचे आचरण चांगले आहे. ज्याच्यात संयम व सहनशीलता आहे. जो सर्वांशी सरळ बुद्धीचे वर्तन करतो. व जो स्वतःचे दुःख इतरांना सांगता दुसऱ्यांचेच दुःख दूर करण्याचा सतत प्रयत्न करतो. अशा व्यक्तीशी मैत्री करण्याचे महाराजांनी सांगितले आहे. तसेच या समाजात काही लोकांना विनाकारणच स्वतःच्या धनसंपत्तीचा गर्व झालेला दिसतो. ते इतरांशी फार गर्वाने व अहंपणाने वागतात. सतत दुसऱ्यांना कमी लेखतात. आशा लोकांविषयी महाराज म्हणतात,

देवाने धनवान तुला रे गर्वासाठी केला का ?
आयुष्याचा नाश कराया नर जन्मी तू आला का ?

जोपर्यंत जीवन आहे तोपर्यंत सर्वांशी प्रेमाने व माणूसकीने वागावे. कशाचाच गर्व अभिमान बाळगू नये. स्वतःच्याच गुर्मीत राहील त्याला महाराज सांगतात,

**कुठवर भोगशील मोजा रे**
**मग येतील यमाच्या फौजा रे**

हे जीवन नश्वर आहे. इथे जन्म घेणाऱ्या प्रत्येकालाच एक दिवस जायचे आहे. त्यामुळे कोणताच गर्व अभिमान न बाळगता सहकार्य भावनेने जीवन जगावे. एकमेकांशी आपुलकीने वागावे कारण येणारा दिवस कसा येईल हे कोणालाच सांगता येत नाही. राजा असणारा रंक केंव्हा होईल हे त्यालाही माहीत नसते.

याविषयी वर्णन करताना एका भजनात तुकडोजी महाराज म्हणतात,

**कोण दिवस येतो कसा कोण जाणतो,**
**एक दिवस हत्ती वरी मिरवती नवऱ्या परि,**
**एक दिवस पीठ भाकरी दारी मागतो**

अति तेथे माती या म्हणी प्रमाणे भविष्याच्या गर्भात काय गुपित लपले आहे हे कोणालाच सांगता येत नाही. त्यामुळे माणसाने अति करू नये कारण ज्याचा जयजयकार केला जातो. ज्याची समाज वाहवा करतो. त्याने गैरवर्तन केल्यावर तोच समाज त्याला मातीत तुडवायलाही कमी करत नाही. किंवा काळही त्याला त्याच्या चुकांची शिक्षा निश्चितच देतो. काही लोकांना विनाकारण चिंता करण्याची सवय सतत कोणत्या ना कोणत्या तरी गोष्टीचा विचार आणि काळजी ते करत राहतात. अशा लोकांविषयी महाराज म्हणतात.

**मानवा का चिंता वाहतो**
**होणारे ते चुकेना केंव्हा**
**नपुसकडे पाहतो**

एखाद्या गोष्टीची चिंता करण्यापेक्षा त्यावर योग्य तो उपाय करणे आवश्यक असते. चिंता करून कोणताही प्रश्न सुटत नाही. त्यामुळे चिंता करू नका असा संदेश तुकडोजी महाराजांनी दिला आहे.

अशाप्रकारे आपल्या अनेक भजनांमधून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी समाजाचे प्रबोधन करण्याचे महान असे कार्य केले आहे.

अशा या महान संतांनी ११ ऑक्टोबर १९६८रोजी या जगाचा निरोप घेतला. आपल्या अनेक भजनांचा ठेवा त्यांनी या समाजाला दिला आहे. त्यांच्या पावन स्मृतींना माझे विनम्र अभिवादन.

# आवश्यक त्या ठिकाणी बदल करणार : मनोज लोहिया

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** पोलिस आयुक्तालय आणि शहरात आवश्यक त्या ठिकाणी बदल केले जातीलच अशी ग्वाहीं पोलीस आयुक्त मनोज लोहिया यांनी दिली. पोलीस आयक्त पदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर प्रथमच ते आधुनिक केसरी न्यूज शी बोलत होते विविध प्रश्नांना त्यानी दिलखुलास उत्तरे दिली बोलतांना त्यांनी सांगितले की,

ज्या अधिकाऱ्यांचा कार्यकाळ पूर्ण झाला आहे असे अधिकारी बदलण्यात येतील चोवीस तासातच मला काही अनुभव येण्यास सुरुवात झाली आहे सर्व अधिकाऱ्यांशी बोलून आणि निरीक्षणा नंतरच निर्णय घेतले जातील एखाद्या ठिकाणी एखादा अधिकारी योग्य बसत असेल किंवा योग्य नसेल तरीही खांदेपालट होईल असे लोहिया म्हणाले दुसऱ्या एका प्रश्नाच्या उत्तरात ते म्हणाले की, पाच दिवसांपूर्वी बेगमपुरा पोलीस ठाण्याच्या हददीत एका तरुणीला हिंदू मुलाशी बोलते म्हणून काही टवाळखोरांनी भररस्त्यात मारहाण केल्याचा व्हिडीओ व्हायरल झाला या प्रकरणी पिडीत मुलगी किंवा तिच्या पालकांनी पोलिसांकडे तक्रार देण्यास नकार दिली तेंव्हा पोलिसांनी स्वतः फिर्यादी होत आरोपीना अटक केली त्याच प्रमाणे जिन्सी पोलीस ठाण्याच्या हददीत तरुणीच्या अपहरणाचा प्रकार रिक्षा चालकाच्या सतर्कतेमुळे पोलिसांनी हाणून पाडला. पोलिसांनी दोन्ही प्रकरणे गांभीर्याने हाताळली आहेत कोणत्याही प्रकरणात शहरातील गुन्हेगारांची कदापीही गय केली जाणार नसल्याचे ते म्हणाले

पोलिसांनी जमावासमोर जाताना लाठीचा वापर करू नये या भूमिकेविषयी बोलताना ते लोहिया म्हणाले की, कायद्याने पोलिसांना कर्तव्य बजावत असताना जे अधिकार दिले आहेत ते त्यांनी वापरलेच पाहिजे. या पूर्वी मी शहरात काम केले आहे पण त्यानंतर बरेच बदलही शहरात झाले आहेत पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत त या पूर्वी काय निर्णय घेतले या सर्व गोष्टीचा आढावा घेण्याचे काम सुरु असल्याचे शेवटी ते म्हणाले.

# अय्युब पठाण यांना बालसाहित्य पुरस्कार प्रदान

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** मराठी बालकुमार साहित्य सभा कोल्हापूर यांच्यावतीने उत्कृष्ठ बालसाहित्य निर्मितीचा राज्यस्तरीय पुरस्कार यंदा पाठयपुस्तकातील प्रसिद्ध कवी अय्युब पठाण लोहगांवकर यांना कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या तथा जेष्ठ साहित्यिक नीलम माणगावे आणि कार्यक्रमाचे अध्यक्ष गोविंद गोडबोले यांच्या हस्ते कोल्हापूर येथील करवीर नगर वाचन मंदीर कोल्हापूर येथे कवी अय्युब पठाण लोहगांवकर यांना सन्मान पूर्वक बालसाहित्य पुरस्कार प्रदान करण्यात आला. आईचा हात या दर्जेदार व आशयघन बालकविता संग्रह असून त्यामध्ये बालकांचे भावविश्व उलगडणाऱ्या कवितांचा समावेश आहे. आतापर्यंत या




संग्रहाला विविध सेवाभावी संस्था-संघटनाकडून आठ राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झालेले आहे. मराठी बालकुमार साहित्य सभा कोल्हापूर यांच्यावतीने अत्यंत प्रतिष्ठेचे व मानाचा समजला जाणारा हा पुरस्कार असून रोख रक्कम, स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र, पुस्तक असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

पाठयपुस्तकातील कवी अय्युब पठाण लोहगांवकरांना हा बालसाहित्य पुरस्कार मिळाल्याने सर्वत्र त्यांचे कौतुक होत आहे.




गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका

(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर